“आपले मंडळ”

|| *Maharashtra Mandal of Detroit* ||

# स्नेहबंध



एप्रिल २०१९

## गुढी पाडवा विशेषांक

With
Best Compliments
from

**Sachin**
**and**
**Anuja**
**Lawande**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | भारती मेहेंदळे | 5 |
| २ | व्यक्ति तितक्या प्रकृती | पूनम तोरगल | 7 |
| ३ | अबोला | किरण मराठे | 11 |
| ४ | उतरलेल्या यौवनाची | शरद घाटपांडे | 14 |
| ५ | सौम्य 'निनाद'णारा वल्ली | सुशांत खोपकर | 15 |
| ६ | Manohar Parrikar in BMM 2017 | नितीन अंतुरकर | 19 |
| ७ | नाटक पहावं करून.......! | Committee Spotlight | 20 |
| ८ | शब्दकोडे | मेधा उमरजी | 22 |
| ९ | दोडका, दुधी, कारली... आणि अमेरिका | सायली मोकाटे जोग | 24 |
| १० | केळकरांची सुप्रिया | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | 27 |
| ११ | Me_मराठी My_मराठी | संजय मेहेंदळे | 31 |
| १२ | सप्तसुरन के भेद सुनाये | सुरेश नायर | 32 |
| १३ | माझी डाएट गाथा | शीतल सोनार | 35 |
| १४ | कल्चर्ड 'संस्कृती' | संकेत मुंढे | 39 |
| १५ | स्वप्नभंग | निरंजन हुंबड | 40 |
| १६ | Carrying Dr. King's Legacy into the Future | सुप्रिया जळूकर | 41 |
| १७ | परिवर्तन | नलिनी गोरे | 44 |
| १८ | ऑफिस नांवाच्या खाणीतील रत्नं ! | शमा सुखटणकर | 45 |
| १९ | यंत्रांपुढे इथे कविता हरली! | ऋतूज देशपांडे | 50 |



**संपादक**

ज्योत्स्ना दिवाडकर | संजय मेहेंदळे
ऋतूज देशपांडे | सुशांत खोपकर | उमा कानडे

**संपादक/सहाय्य**

मेधा उमरजी

**मुखपृष्ठ रचना व मांडणी**

मानसी डहाणूकर


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना
संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



# The N. Rachmale Foundation

**Prosperity Through Service**

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

LHG – Lakeshore Healthcare Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# स्नेहबंध



गुढी  उभारुनी आकाशी
तोरण बांधुनी दाराशी
काढुनी रांगोळी अंगणी
करु सुरुवात नववर्षाची

**नमस्कार मंडळी,**
**आपणा सर्वांना गुढी पाडव्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!**

म्हणता म्हणता मंडळाचा 2019 मधील हा सहावा कार्यक्रम! दर वर्षीप्रमाणेच आपल्या कार्यक्रमांची सुरुवात आपण Gleaners volunteer event ने केली. मिशिगनच्या कडाक्याच्या थंडीतही आपली young volunteer मंडळी अगदी उत्साहाने आली होती. कित्येक टन याम (sweet potato) पॅक करून गरजूंना ते पाठवण्यात आलं. आपल्या व्यस्त वेळापत्रकात कम्युनिटीसाठी काम करणं हे किती महत्त्वाचं आणि तेवढंच समाधान देणारं आहे याची प्रचिती सर्वांना आली.

दुसरा कार्यक्रम हा संक्रांतीचा! मृदुला दाढे जोशी यांच्या "मृदुल स्वर" या मराठी आणि हिंदी संगीतावर आधारित अतिशय अभ्यासपूर्ण माहितीसहित गाण्यातील सौंदर्यस्थळे शोधायची एक कलाच शिकायला मिळाली.

यानंतर कॅरम स्पर्धेचे आयोजन १६ फेब्रुवारीला केले होते. त्यात लहान मोठे अशा ३८ स्पर्धकांनी  भाग घेतला होता. टोरोंटो, ओहायो येथून खास खेळण्यासाठी लोक आले होते. ही स्पर्धा अतिशय चुरशीची झाली. त्यात सिंगल्समध्ये रणजित सप्रे विजेता तर वेणू मुकेरा उपविजेता ठरला. डबल्समध्ये अन्वर आणि हॅरिस  ह्यांना विजेतेपद मिळाले तर सतीश दुपाटी आणि वेणू मुकेरा ह्यांनी उपविजेतेपद पटकावले. ह्या स्पर्धेचे प्रथमच फेसबुक लाईव्ह वरून प्रक्षेपण करण्यात आले.

यावर्षीच्या "रसिका तुझ्याचसाठी" या मालिकेची सुरुवातही जोरदार झाली. Design of Meaningful Artifacts हे इंडस्ट्रियल प्रॉडक्ट डिझाईन वर आधारित जीवक बडवे याचे प्रेझेंटेशन खूपच माहितीपूर्ण होते. आपल्या आजूबाजूंच्या वस्तू वापरून आपण एखादी नवीन डिझाईन निर्मिती कशी करू शकतो, या प्रक्रियेतील पायऱ्या कोणत्या याची माहिती मिळाली. याचा प्रश्नोत्तराचा भागही खूप छान झाला. पारंपरिक कलेला फाटा देऊन सायन्स वर आधारित असा हा कार्यक्रम एकदम हटके ठरला. याच मालिकेमधील पुढचा कार्यक्रम रविवार १२ मे  रोजी कॉस्टिक सेंटर, फार्मिंगटन हिल्स येथे होणार आहे. ह्यात श्री. देवदत्त कुलकर्णी "तू माझा सांगाती"  हा ज्ञानेश्वरीवरील त्यांच्या अभ्यासावर आधारित निरूपण आणि प्रश्नोत्तरे असा हा कार्यक्रम असेल. सौ. मृणालिनी अर्काटकर ह्याचे  पसायदानसुद्धा आपल्याला ऐकायला मिळेल.

यंदा आपण भारतातून "अमर फोटो स्टुडिओ" हे प्रायोगिक रंगभूमीवरील नाटक आणले होते. त्याला ५१९ तिकिटविक्री होऊन उच्चांकी  प्रतिसाद मिळाला. तीन पिढयांना खिळवून ठेवणारे हे नाटक डेट्रॉईटच्या चोखंदळ प्रेक्षकांकडून वाहवा मिळवून गेले. एवढेच नव्हे तर अमेरिकेत वाढलेल्या तिसऱ्या पिढीलाही ते आवडले हे विशेष!!

आपली यंदाची युथ कमिटी नवनवीन उपक्रमांचे आयोजन करीत आहे. मुव्ही नाईट २९ मार्च रोजी उत्साहात साजरी झाली. ३८ मुलांनी ह्यात भाग घेतला होता. आपले गोल्ड स्पॉन्सर प्रबोध देशमुख (माया प्रेप क्लासेस) यांनी मुलांना शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी चेकलिस्ट काय असावी याबद्दल प्रेझेंटेशन दिले. नंतर पिझ्झा, लेमोनेड, आइस्क्रीम, कुकीज ची मेजवानी झाली. कहूट, गेम्स, डान्स, म्युसिक आणि मूव्ही...  मुलांनी मस्त धमाल केली. शिवाय जुनो आणि टेडी या कुत्र्यांशी मुलांची चांगलीच दोस्ती झाली.

# स्नेहबंध

या वर्षी आपण प्रथमच "हेल्थ इज वेल्थ" ही मालिका चालू करीत आहोत. ह्याच्या अंतर्गत २२ जून ह्या इंटरनॅशनल योग दिवसानिमित्ताने योगथॉन आयोजित केले आहे. तरी सर्वांनी ह्यात भाग घेऊन लाभ घ्यावा ही विनंती. यंदा टेबलटेनिस स्पर्धा ५ मे रोजी फार्मिंगटन येथे होईल तसेच पिकनिक २1 जुलै रोजी केन्सिंगटन पार्क येथे होईल. ह्याच्या मेनूचे नियोजन आत्तापासूनच चालू झाले आहे.

आत्तापर्यंत झालेल्या सर्व कार्यक्रमांना लाभलेल्या तुमच्या सर्वांच्या भरघोस प्रतिसादामुळे आमचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. आमचे सर्व कार्यकर्ते आपापले व्याप सांभाळून मंडळाच्या कामाला वाहून घेत आहेत. दिवसेंदिवस मंडळाच्या कार्यक्रमांचा दर्जा असाच उंचावत जावा आणि आमच्या नवनवीन उपक्रमांना आपली उपस्थिती लाभावी ही सदिच्छा!

आपली विश्वासू


**भारती मेहेंदळे**

**अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट**

**ई-मेल: bharati.mehendale@mmdet.org**

**फोन: ७३४-६७४-३६८७**




# स्नेहबंध

## व्यक्ति  तितक्या प्रकृती .....



गुरुवार संध्याकाळ... म्हणजे आज "छायागीत"! पटापट अभ्यास संपवला नाही तर आई काही टी. व्ही. लावून देणार नाही असा विचार करत घरी आले. अभ्यासाला बसणार तोच... तळमजल्यावरचा राहुलदादा झेवियर्स कॉलेजमधून घरी आल्याची पावती मिळाली. कशी म्हणुन काय विचारता? तो घरी आला की बूट काढायच्या अगोदरच स्टिरीयो लावायचा. तो देखील अख्खी गल्ली दुमदुमेल अशा वोल्युम मधे. आवडही अर्थात झेवियर्सला शोभेल अशीच. चिक्कार ढाम-ढाम आणि एकही शब्द न ओळखू येणारं पाश्चात्य संगीत. राहुलदादा उठल्याचं, घरातून बाहेर पडल्याचं, घरी आल्याचं आणि झोपल्याचं सगळ्या बिल्डिंगला आपोआप कळायचं. कसं? म्युजिक चालू – दादा घरी आणि जागा; म्युजिक बंद – दादा झोपलाय किंवा बाहेर! काय, आहे की नाही सोपं? अर्धवट वाढलेले दाढीचे खुंट, झिपरे प्रयत्न करून विस्कटलेले वाटावे असे विंचरलेले केस, अत्यंत जुनाट दिसणारी विटलेली जीन आणि भडक चित्र असलेला गोल गळ्याचा टी-शर्ट. म्हणजे हा कॉलेजला चालला का लग्नाला, कळायला तसा काही मार्ग नसायचा. त्याचं हे वागणं आमच्या आजीला अजिबात पटायचं नाही. नेहमी कुरकुरायची– "तऱ्हेवाईक कार्टं. न्हाव्याकडे जा म्हणावं. चांगल्या घरातल्या मुलानी असं कळकट राहणं शोभतं का? जरा रोहिणीकडून शीक. कशी नीटनेटकी असते पोर". मला मात्र राहुलदादाच्या वागण्यात काहीच गैर वाटायचं नाही. कसला बिनधास्त होता राव! त्याच्याशी गप्पा मारायला मज्जा यायची. कुठलाही मज्जाव नाही! बोलता बोलता खूप काही शिकायला मिळायचं. सगळ्या ट्रेंडी गोष्टींची जाण असायची त्याला. आपल्याला काय हवंय, काय नकोय ते किती लोकांना माहित असतं सांगा? तो मात्र आपल्या मनाला रुचेल तेच करायचा. म्हणजे थोडक्यात सांगायचं तर – "कुणीही निंदा, कुणीही वंदा, आमचा स्वहिताचा धंदा चालू!". अहो पण असं करायला सुद्धा दम लागतो. सगळ्यांना नाही जमत ते! पण गंमत सांगते आजीच्या दृष्टीने वल्ली असलेला राहुलदादा, टोटल हिरो होता. अहो दर शनिवारी रात्री होणाऱ्या त्याच्या पार्टीत मित्रांपेक्षा; मैत्रिणींची संख्या नेहमीच जास्त! पण पार्टीच्यावेळी रोहिणीताई काय करत असावी बरं?

रोहिणीताई – राहुलदादाची थोरली बहीण, म्हणजे वयात फक्त सव्वा वर्षाचं अंतर.  पण दोघांमधे जमीन-अस्मानाचा फरक! राहुलदादा जितका जगन्मित्र रोहिणीताई तितकीच एकलकोंडी. तो धडाकेबाज आणि ती मांजरपावलांपेक्षाही शांत. दादाच्या कशालाच वेळकाळ नाही. ताईचं सगळंच घड्याळाच्या काट्यासारखं. तो सावळा, रांगडा तर ती गौर, नाजूक. आणि फक्त बांध्यानीच नाही बरं का, ती सगळीच नाजूक होती. तिचा आवाजही नाजूक होता. रोज सकाळी मी (बळेबळेच उठून) देवासाठी फुलं काढायला जायचे तेव्हा काय तो तिचा आवाज ऐकू यायचा. इतक्या सकाळी राहुलदादा उठला असता तर सूर्यदेव स्वतः त्याचं दर्शन घ्यायला आला असता. रोहिणीताई नियमानी सकाळी तानपुरा घेऊन शास्त्रीय संगीताचा रियाज करायची. मग शिवाजी-पार्कला दोन फेऱ्या आणि नंतर आटपून ९:१५ला कॉलेज. तिचं अभ्यासाचं टेबल खिडकीलगत होतं. त्यामुळे आम्ही संध्याकाळी शाळेतुन घरी यायचो तेव्हा ती खाली मान घालून  अभ्यास करताना दिसायची. तिचं सगळंच मोजून-मापून, नेटकं होतं. कधी मी "हाय" केलं तर छोटसं स्मित-हास्य. खिदळताना, खेकसताना, खोडी काढताना तर सोडा; पण कुणाबरोबर संभाषण करताना देखील तिला मी बघितल्याचं आठवत नाही. तेल लावुन घट्ट घातलेली वेणी आणि कडक इस्त्रीचा नाजूक प्रिंटचा हलक्या रंगाचा सलवार-कमीज. अहो, दुपट्टा सुद्धा घडी घालून दोन्ही खांद्यावर सेफ्टी-पिन लावून , दोन्ही बाजू समान करून, समोर "व्ही" दिसेल असा घ्यायची. तिला चुकून काही विचारायची पाळी आलीच तर जरा धाकधूकच वाटायची. नवीन कोऱ्या बॉक्स मधली बाहुली उगीच आपल्यामुळे विस्कटायला नको असं वाटतं ना, तसं काहीसं. बाहुलीत जो गोडवा असतो ना, अगदी तसा भास व्हायचा रोहिणीताईत. राहुलदादाच्या बेशिस्तपणात आत्मविश्वास होता, रोहिणीताईच्या शिस्तशीरपणात नितळ नियमन. एक विराट रान होतं, तर एक प्राजक्ताचा सडा! तिच्यावर कुणी रागवणे शक्यच नव्हतं. अगदी दादांना सुद्धा !

# स्नेहबंध

दादा कोण? आमच्या बिल्डिंगमधली अजून एक विलक्षण 'प्रकृती". असं बघा; आमच्या बिल्डिंगमधे पाच घरटी. तळ आणि पहिल्या मजल्यावर दोन आणि दुसऱ्या मजल्यावर एक. पण प्रत्येक घर - अफलातून! प्रत्येक व्यक्तिमत्वाचा रंग निराळा. तळमजल्यावर दुसरं घर होतं गोडबोल्याचं. घरातले प्रमुख दादा. बिल्डिंगमधल्या सगळ्या मुलांना वळण लावायची जबाबदारी आपली आहे असाच त्यांचा समाज असावा. वय सुमारे सत्तरीचे. अंगावर पांढरा लेंगा-सदरा. डोळ्यावर जाड भिंगाचा चष्मा, जो अर्ध्या वेळेला नाकाच्या अर्ध्यावर असायचा. कपाळाला कायम आठ्या. मी पाहिल्यापासून ते रिटायर होते. घराबाहेर त्यांनी फुलबाग केली होती. दिवसातला बराच वेळ ते तिथेच असायचे. त्यात दासाळा, अनंत, चाफा, अनेक फुलं होती. पण दादांची नजर घारीच्या वरताण. त्यांच्या मनाविरुद्ध आम्ही फुलांकडे नुसतं बघितलं तरी खेळ खतम! कळ्यांवर वर दादांचं खास प्रेम. ॲडव्हान्स-बुकिंग करायला लागायचं. चुकून फुलं काढताना एखादी कळी तुटली तर धपाटे नक्की! वर घरी तत्काळ तक्रार जायची ती निराळी. पण दादांचा खरा छंद होता मुलांवर पाळत ठेवणं. कोण-कधी-कुठे होतं दादांना इत्थंभूत बातमी असायची. चुकून कधी गल्लीच्या कोपऱ्यावर पाच मिनिट गप्पा मारत थांबलो तर हे नेमके टपकायचे. वर लगेच – "काय गं, काय चाललंय तुमचं इथे? घरी माहित आहे का इथे वेळ काढत उभ्या आहात ते?" असले भोचक प्रश्न बेधडक विचारायचे. त्यामुळे ते दिसले की आमची पांगापांग झालीच समजा. आपलं नाव गोडबोले आहे, किमान म्हणुन तरी कधी गोड बोलावं. छे! चेहरा नेहमीच करडा. नाकावरच्या चष्म्यावरून डोळे रोखतच बोलायची लकब. बरं प्रश्न पण रोज तेचतेच. सकाळी "काय, शाळेत ना?" आणि संध्याकाळी "कुठून? शाळेतून?". आता मला सांगा – शाळेचा युनिफोर्म घालून, दप्तर घेऊन रोज आम्ही सत्यनारायण घालायला जाऊ शकत होतो का? पण काही बोलायची शहामत कुणाची होती. मुकाट्यानी हो म्हणायचो. अहो, अगदी संक्रांतीलासुद्धा तिळगूळ घेताना "एक लाडू दे. उगीच उधळेपणा नको. आणि नीट गुडघ्यातून वाकून नमस्कार कर. कमरेत वाकलीस तर दणका घालीन" हा सुमधुर आशीर्वाद मिळायचा.



आणि ह्याच्या बरोब्बर उलट आमच्या शेजारचे पप्पा. पप्पा म्हणजे शेजारच्या घरातले आजोबा. प्रेमळपणाचं मूर्तिमंत उदाहरण. दादा रखरखीत कांबळ तर पप्पा म्हणजे तलम मऊ रेशीम. स्वतःच्या नातवंडांचेच नव्हे तर बिल्डिंग मधल्या आम्हा सगळ्याच मुलांचे लाड करायचे. त्यांच्या बोलणं संथ आणि स्वर गोड. घरात कोकणी बोलत असल्यामुळे त्याला एक उपजत हेल होता. त्यामुळे ते आणखीन हळू बोलताहेत असं वाटायचं. अंगावर एक साधा शर्ट, लुंगी आणि उपरणं. पप्पा कधी आम्हा मुलांना रागावले तर नाहीच, उलट आम्हाला दुसरं कुणी रागावलेलं सुद्धा पप्पांना फारसं आवडायचं नाही. आमच्या समोर नाही, पण नंतर आईला सांगताना ऐकलंय मी – "रागावून सांगण्यापेक्षा शांतपणे समजावून तिच्या कलेनी सांगावं".
आता आमच्या आईला शांत रहा सांगणं म्हणजे ज्वालामुखीला स्फोट करू नको - असं म्हणण्यासारखं आहे. पण तरीही पप्पांनी तिला सांगायचं सोडलं नाही. ती पुन्हा-पुन्हा चिडली तरी ते तिच्यावर कधीच चिडले नाहीत. त्याचं धोरण साधं होतं – भीतीने किंवा मनाविरूद्ध फक्त उपरं शिकवणं होतं. मनाला पटलं तर प्रभाव जास्त होतो. पण कुणाचं मन दुखवायचं नाही. आणि म्हणुन त्यांचे उपाय पण सॉलिड मस्त असायचे. आता हेच बघा ना. आमच्या घरी चातुर्मास पाळला जायचा. मी तर पक्की मासे-खाऊ. फार पंचाईत व्हायची माझी. दर वर्षी पप्पा आईला, आजीला समजावण्याचा प्रयत्न करायचे की मुलांवर ही बंधनं घालू नका. पण आजी कसली ऐकतेय. तिला आम्ही बाहेर खाल्लेलं सुद्धा चालायचं नाही. मग पप्पा काय करायचे माहित आहे? ते त्यांच्या घरी मासे तळायला सांगायचे. दार उघडं असायचं. मग मला हाक मारायचे आणि म्हणायचे या वासावर आता वरण-भात खा. दुधाची तहान ताकावर भागव! काय? आहे की नाही भारी तोडगा? दादाचं मते – छडी लागे छमछम, तर पप्पांना वाटे कोणतीही सक्ती अयोग्य. एक (लेंग्यातला) जमदग्नी तर एक (लुंगीतला) गौतमबुद्ध!

# स्नेहबंध

आणि तिसरी आमची आजी! आता हिच्याबद्दल तर सांगावं ते कमीच. मूळची कोकणी आजी सासरी आल्यावर मराठी शिकली. पण तिला हिंदी फारसं बोलता यायचं नाही. पण म्हणुन काय! घरी येणाऱ्या भाजीवाल्याशी मात्र ती फाड-फाड हिंदीतच बोलायची. म्हणजे बघा हं – “क्या रे भैय्या, तू काल का नाही आया? आधी सांगनेका ना. आणि भाव इतना महाग क्या लावता है? मार्केट में तो स्वस्त है”. खरं तर आजी फारच क्वचित घराबाहेर पडायची. अगदी गेलीच तर आमच्या सोबत उद्यान-गणपती किंवा मठात. खरेदी वगैरे तर कधीच नाही. पण तरीही होरा असा की आत्ताच बाजारातून आली आहे. कहर तर नारळ घेताना असायचा. कारण नारळ म्हणजे आजीचा जीव की प्राण. आमटी, भाजी, वरून भुरभुरवून.. हजार वेळा सतत लागायचा. पण खवून ठेवलेला मात्र चालायचा नाही. तेव्हाच्या तेव्हा खवायचा. मग वेळी-अवेळी “पटकन खवून दे” अशी आज्ञा यायची. चुकुन जर पांढऱ्या खोबऱ्यात काळा ठिपका दिसला, तर पाठीत एक पडलाच म्हणुन समजायचं. दहा वेळा टणटण वाजवुन, परखून घ्यायची. वर “भैय्या, नीट बघून देओ. कुजका निकला ना, तो उद्या परत!” अशी इरसाल हिंदी धमकी. आणि नऊवारीतल्या आमच्या मराठमोळ्या आजीचं धेडगुजरी हिंदी भैय्याला व्यवस्थित समजायचं देखील. तो त्याच्या हिंदीत बोलायचा आणि आजी तिच्या. दोघांनीही आपापली भाषा सोडली नाही. मोलभाव यथासांग व्हायचा. दरवेळी तीच झिकझिक. नारळ कधीही कुजका निघाला नाही हे नशिब आमचं. पण म्हणून आजीकडून एखाद्या वेळी सांगायचं राहिलंय? तर नाही! काय आहे की नाही आमची “हिराठी” आजी स्पेशल? पप्पा, दादा आणि आमची आजी तसे साधारण एकाच वयाचे. पण तिघांमधे वय सोडलं तर तसं काहीही साम्य नाही. जगाच्या रांगोळीत प्रत्येकाचा रंग विशेष आणि वेगळा. आणि तोही ठळक!

आणि मग.... बेल वाजली! दार उघडलं तर समोर एक विशीतला मुलगा. कानडीत काही तरी म्हणाला. त्यातलं “धारवाड” आणि “अण्णा” हे दोन शब्द मला कळले. हातातल्या सामानाकडे बघता धारवाडहून आलाय, आजोबांचं घर का असा काहीसा आशय असावा. काय सही स्वरूप होतं हो त्या “अप्पा”चं. म्हणजे काय? अहो त्याच्या बद्दलच काय, आणखीन खूप जणांबद्दल खूप काही सांगायचं आहे तुम्हाला. आमच्या आसपास “नमुन्यांची" कमी नाही! आणि ह्या सगळ्याचं नंतर काय झालं ते तरी कुठे सांगितलंय मी. आता कुठे मी फक्त झलक दिलीये. बाकी ब्रेक के बाद! तोवर ही सगळी मंडळी तुम्हाला कशी वाटली? वल्ली का आणखीन काही... ते तुम्ही ठरवा. हं, पण मला सांगायला विसरायचं नाही बरं का.

**पूनम तोरगल**

# *Pillars of Strength and Character.*

*Premier Provider for Property and Casualty Insurance*




**HERITAGE® Insurance**

(855) 536-2744

www.heritagepci.com

**WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC. AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.**

मिटींग संपता संपत नव्हती. ऑफिसमधून घरी पोहोचायला सुधाला कमीत कमी एक तास उशीर होणार होता.  जास्त उशीर झाला तर सुहास पुन्हा अबोला धरणार. सुधाने पुन्हा एकदा हातातल्या घडाळ्यावर नजर टाकली. "ह्या मिटींग्ज वेळेत घ्यायला काय होतं ह्या अय्यरला ! घरी जायची घाई असली की बरोब्बर मिटींग घ्यायला सुचतं याला. शिवाय मिटींगचा उपयोग काही नाही."

# अबोला

"सुधा, सुधा! “

सुधाने चमकून अय्यरकडे पाहिलं.

"मी तुला डिस्टर्ब नाही ना केलं?" अय्यर तिच्याकडे पाहून कुत्सितपणे हसून म्हणाला.
"अं! नाही सर. माझं लक्ष आहे सर." सुधा मनातला सगळा राग चेहर्यावर दिसू न देता चेहर्यावर खोटं स्मित आणून म्हणाली.

अय्यरने घसा खाकरुन त्याचं बोरिंग भाषण पुढे चालू ठेवलं. सध्याची इकॉनॉमी, कंपनीचा सेल्स चार्ट, नविन क्षेत्रात घुसण्यासाठी कंपनी कसे प्रयत्न करत आहे वगैरे वगैरे.
सुधा पुन्हा सुहासचा विचार करू लागली. लग्नाला दोन वर्ष होत आली होती त्यांच्या. वरवर पाहता सगळं सुरळीतच होतं. पण गेले काही महीने सुधाच्या नोकरीमधल्या जबाबदार्या खूप वाढल्या होत्या. पण प्रमोशन मिळालं की त्याबरोबर जवाबदाऱ्या वाढणारच. आजकाल सुधाला घरी पोहोचायला उशीर व्हायला लागला होता. सुहास तसा समजूतदार होता. पण आज दोघांनी बाहेर जायचा प्लॅन बनवला होता, आणि आता सगळा प्लॅन कॅन्सल करावा लागणार होता. हे असं आज तिसऱ्यांदा होत होतं. त्यामुळे सुहास नाराज होणार होता. सुहास रागावला की तिच्याशी अबोला धरायचा. सुधाला त्याच्या नाराजीचं कारण कळत होतं. बेडरूममध्ये पुस्तक वाचत फुरगुंटून बसलेला सुहास तिच्या डोळ्यासमोर आला आणि त्याच्या असल्या बालिश अवतारचं तिला नकळत हसूच आलं.



खुर्च्या सरकल्याचा आवाज आला आणि मिटींग संपल्याचं सुधाच्या लक्षात आलं. पटकन उठून ती तिच्या केबिन मधे आली. पर्स खांद्याला लावली. तिच्या इतर सहकार्यांना "बाय" वगैरे म्हणण्याच्या मनस्थितीत आज ती नव्हतीच. आधीच अय्यरने डोकं खाल्लेलं होतं, त्यात आणखीन कोणी थांबवू नये म्हणून कोणाशीही न बोलता तिने लिफ्टच्या दिशेने चटचट पावलं उचलायला सुरूवात केली. उतावीळपणे लिफ्टचं बटण दोन दोन वेळा दाबलं पण लिफ्ट काही येत नव्हती.

लिफ्ट अजून आठव्या मजल्यावरच होती. त्रासून तिने जिन्यांकडे जाणारा दरवाजा उघडला. ऑफिस तिसर्या मजल्यावरच होतं त्यामुळे लिफ्ट पोहोचायच्या आगोदरच आपण खाली पोहोचू असा तिचा अंदाज होता. जणू प्रत्येक सेकंद वाचवून तीचा गेलेला वेळ भरून येणार होता. जिन्यात अर्थात कोणी नव्हतं. सुधा भराभर जिने उतरायला लागली. तिने घडाळ्याकडे पटकन नजर टाकली तर घडाळ्यात आठ वाजत आले होते."म्हणजे आज दोन तास उशीर होणार आपल्याला पोहोचायला".  तिच्या मनात विचार आला. तोच पटकन पायरी निसटून तिचा तोल गेला. तिने कसाबसा कठडा धरला आणि पडता पडता वाचली. "हील मोडली वाटतं" तिनं पायातल्या सँडलकडे बघितलं. हील अजूनही शाबूत होती.

# स्नेहबंध

मग न थांबता ती बिल्डिंगच्या बाहेर आली. नेहमीप्रमाणे रस्त्यावर माणसांचे लोंढे. मुंबईत बघावं तेव्हा गर्दी. त्या गर्दीत मिसळून जाउन तिने स्टेशन गाठलं. गाडीमधली गर्दी, भांडणांचे आवाज, विचित्र वास सगळ्याची सवय झाल्यामुळे त्याही परिस्थितीत गाडी तरी वेळेवर मिळाली याचंच तिला थोडं बरं वाटत होतं. एका हाताने वरची कडी पकडून तिने थोडावेळ डोळे मिटले. पुन्हा सुहासच्या विचारांत मन गुंतलं. "नवरा समजूतदार आहे हो तुझा! आमच्यासारखं नाही तुमचं. दोघांचा राजाराणीचा संसार. एकमेकांना सांभाळून नीट राहा. आणि काय मेलं ते ऑफिस ऑफिस करत असतेस! जरा घरी पण वेळ देत जा! करायच्येत काय मेले एवढे पैसे, संसारात सुख हवं गो" सुधाला आईचा सल्ला आठवत होता. "एकदा माझं हे प्रोजेक्ट संपलं की कुठेतरी मस्त फिरायला जायला पाहिजे आठवडाभर." तिने मनाशी पक्कं केलं.

स्टेशन आलं तसं पुरात लोटून दिल्यासारखं तिने स्वत:ला प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीत लोटून दिलं आणि गाडीतून उतरली. भरभर जिने चढून स्टेशनच्या बाहेर पडली. आज एकही रिक्षावाला तिच्या हाकेला थांबत नव्हता. "माज आलाय सगळ्यांना" तिने नेहमीचं वाक्य उच्चारलं आणि झरझर पावलं टाकत घर गाठलं.

घर जवळ आलं तसं रस्त्यातून नेहमी प्रमाणे घराच्या खिडकीकडे लक्ष गेलं. लाईट लागलेला होता. सुहास वाट पाहात असेल. तिनं दरवाजा हळूच उघडला. "सुहास!" तिनं हाक मारली. सुहासचा प्रतिसाद आला नाही. अपेक्षेप्रमाणे आज सुहासचा मूड गेलेला असणार. स्वयंपाकघरात ओट्यावर गार गार झालेला चहा तिला दिसला. सुहासने आज हॉटेलमधून खास तिच्या आवडीचं जेवण आणलेलं होतं. तेही गारगोट्या होऊन ओट्यावर जसं च्या तसं पडलं होतं. एक अपराधीपणाची भावना तिच्या मनात निर्माण झाली होती. सुहास टिव्ही बघत सोफ्यावर बसला होता.

सुधा त्याच्या शेजारी जाऊन बसली. "सुहास ! सॉरी रे, आज त्या अय्यरने शेवटच्या क्षणी मिटींगमध्ये बोलाऊन घेतलं... मी आज वेळेवरच येणार होते." पण सुहासचा मूड आज खरोखरच वाईट असावा. त्याने तिच्याकडे अजिबात बघितलं नाही. उगाच घडाळ्याकडे एक कटाक्ष टाकून तो उगाच रिमोट ची बटणं दाबत राहिला. "अरे असं काय करतोस. मला आवडतं का रे असं उशीरा यायला? आपल्या संसारासाठीच तर करतेय ना रे." तिच्या डोळ्यात चटकन पाणी उभं राहीलं. पण सुहासचं टीव्हीवरचं लक्ष काही कमी झालं नाही.

इतक्यात फोन वाजला. सुहासने पटकन उठून फोन उचलला.

"नाही" सुहास कोणालातरी सांगत होता. "आजही उशीर... हं... आजकाल रोजचंच व्हायला लागलं आहे तिचं."

सुहास सुधाच्या देखत कोणा तिसऱ्याकडे तिची तक्रार करत होता... सुधाला विश्वासच वाटत नव्हता. सुहास असं करणाऱ्यातला नाही. उलट दुसऱ्यांपुढे तोच आपल्याला किती सांभाळून घेतो. त्या क्षणात त्याच्याशी बोलण्याची तिची इच्छाच गेली. "मी थोडावेळ ग्यालरीत बसतेय" असं म्हणून ती ग्यालरीतल्या टांगलेल्या झोपाळ्यावर जाऊन बसली.

सुहास अजूनही फोनवरच बोलत होता. सुधाचं घरातलं अस्तित्वच त्याने वजा करून टाकलं होतं. थोडावेळ ग्यालरीत बसल्यानंतर मोकळ्या हवेत सुधाला थोडं बरं वाटलं. थंड हवेत किंचीत काळ तिचा डोळा लागला. जाग आली तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. बाहेर आता थोडी थंडी पडायला लागली होती. सुधा पुन्हा घरात आली. सुहासने ओट्यावरचं सगळं साफ करून ठेवलं होतं. टिव्ही पण बंद होता. 'बहुतेक झोपायला गेला असेल' असा विचार करून सुधा बेडरूम मधे आली. सुहास बेडवर पडला होता. पण कुठलसं पुस्तक वाचत होता. सुधा हळूच त्याच्या बाजूला येउन बसली. "सुहास, असं रे काय करतोस. बोल ना माझ्याशी", पण सुहास अजूनही अबोला धरून होता. आता मात्र सुधाला त्याचा राग येऊ लागला होता. "आज असं काय विशेष आहे? तुझा प्रॉब्लेम तरी काय आहे? जरा उशीर झाला म्हणून इतकं रागवायचं? मी काही स्वतः मजा करण्यासाठी बाहेर गेले नव्हते ना! आणि शिवाय मी माफीपण मागितली तुझी... यु आर टेकिंग इट टू फार" सटसट गोळ्यांसारखी तिची वाक्य निघून गेली.

# स्नेहबंध

पण सुहासवर त्याचा काडीचाही परिणाम झाला नाही. पुन्हा एकदा घडाळ्यावर नजर टाकून त्याने दिवा मालवला आणि कूस बदलून घेतली. सुधा बेडच्या एका टोकाला डोळ्यांवर हात टाकून पडून राहीली.

रात्री कधीतरी बेलच्या आवाजाने दोघांनाही जाग आली. "मी उठते" असं सुधा म्हणेपर्यंत सुहास उठलासुद्धा. सुधा बाहेर आली तेव्हा सुहास दार उघडत होता.

"मी इन्स्पेटर साळवी, आपण मिस्टर साठे का?" सुहास आणि सुधा दोघही गोंधळून गेले होते. सुहासने मान डोलावली.

"मी दोन मिनीटं आत येऊ का?" साळवी म्हणाले. सुहासने मागे होऊन दार उघडलं. सुधा जरा बावरूनच गेली होती. सुहासच्या बाजूला उभी राहून ती साळवींना म्हणाली "काय झालं इन्स्पेक्टर साहेब?"

"सौ. सुधा साठे तुमच्या पत्नी का?" साळवींनी विचारलं तसं सुधा तडक म्हणाली "अर्थात. दिसत नाही का तुम्हाला?"
सुहासने होकारार्थी मान हलवली.

साळवींनी सुहासच्या खांद्यावर थोपटत म्हटलं "आज संध्याकाळी त्यांच्या ऑफिसच्या इमारतीच्या जिन्यातून पाय निसटून त्या पडल्या, डोक्याला जबरदस्त मार बसला आणि जागच्या जागीच त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या ऑफिसमधून घराचा पत्ता मिळाला. बॉडीची ओळख पटवायला तुम्हाला यावं लागेल."

"अहो काय वाट्टेल ते काय बोलताय तुम्ही!... अरे सुहास मी इथेच आहे रे... ती कोणीतरी दुसरीच बाई असणार..." सुधा ओरडत होती... आणि सुहासच्या तोंडून अजूनही शब्द फुटत नव्हता.

**किरण मराठे**

# उतरलेल्या यौवनाची

उतरलेल्या यौवनाची माधुरी भासे नवी
विसरलेल्या त्या क्षणांची उजळणी आता हवी ।। धृ ।।

साद होता तू दिला त्या नवोढया सुंदरीला
सुगंधी जोषातल्या भर यौवनाच्या पाकळीला
मंदगंधा ती अझुनी त्या प्रसंगा आठवी
विसरलेल्या त्या क्षणांची उजळणी आता हवी ।। १ ।।

गीत झाले जरी पुराणे, चाल नवी त्या चालते
मद्य झाले जुने, तरी झिंग नवी ते आणते
वेल सुकली पुरी, तरी फुटतसे नवी त्या पालवी
विसरलेल्या त्या क्षणांची उजळणी आता हवी ।। २ ।।

जोम नसला तो रांगडा, पण मन तुझे ना मालावले
वाढत्या वर्षांसवे ना तेज अगदी लोपले
शेषशरदा संगतीच्या घ्यावया नाना चवी
विसरलेल्या त्या क्षणांची उजळणी आता हवी ।। ३ ।।

**- शरद घाटपांडे**

# सौम्य 'निनाद'णारा वल्ली



निनाद आणि माझी ओळख खरं सांगायचं तर आमच्यातल्या creative differences पासून झाली. MMD संक्रांत २०१५.. 'जब वी मेट' च्या वेळी, जे मला योग्य वाटलं ते त्याला वाटलं नाही आणि जे त्याला योग्य वाटलं ते मला वाटलं नाही. कार्यक्रम खूप चांगला झाला ही गोष्ट वेगळी. पण असे जर creative मतभेद झाले, तर माझ्यासारखा introvert माणूस काय करेल? तर लांब राहायचा प्रयत्न करेल. लाजाळूसारखा बुजून बसेल. आपल्या स्वत:च्या कोशात जाऊन बसेल.. खरंतर निनादसुद्धा माझ्यासारखाच स्वभावाने introvert.. पण त्याने असं केलं नाही..

झालेलं सगळं विसरून त्याने BMM 2017 ला माझ्या बरोबर पुन्हा एकदा एकत्र काम करायचं ठरवलं. माझ्या मनात शंका होती. पुन्हा एकत्र काम करायला मला जमेल का? पण का कोण जाणे, मी हो म्हटलं.. आणि त्यानंतर निनादबरोबर काम करणं मी इतकं enjoy केलं, की आज मला तो माझा one of the best decisions वाटतो!

BMM 2017 साठी आम्ही दोघांनी २ वर्ष एकत्र काम केलं. Communication Committee चा निनाद Chair होता आणि मी co-chair. त्या २ वर्षात निनादबरोबर काम करून, त्याचं काम बघून, त्याचे Facebook status वाचून, त्याची गाणी ऐकून 'निनाद जोशी' ही काय चीज आहे, हे माझ्या लक्षात यायला लागलं आणि अगदी थोडक्यात सांगायचं, तर मी त्याचा फॅन झालो!

निनाद एक उत्तम लेखक होता. त्याने लिहिलेल्या फक्त २-३ ओळी वाचल्या की त्याचं talent दिसून यायचं. हा त्याचा एकदा फेसबुक status होता.. - "Waking up to -23 F is brutal, even from inside the house. The sun is bright, but fake and hollow. Like a smile on a contestant in a Miss World pageant."! त्याची English language वर एक वेगळीच कमांड होती. अलकांरिक, सजलेली, but with just the right amount of ornaments. त्याचं लेखन कधीच वाचायला जड गेलं नाही.

निनाद प्रतिभावंत तर होताच, पण त्याला excellence चा, वेगवेगळ्या क्षेत्रात सतत काहीतरी चांगलं करत राहायचा जणू किडाच चावला होता असं मला वाटतं! "तुझ्या Hobbies काय आहेत?" असं कुणी मला विचारलं, तर उत्तर द्यायच्या आधी मला विचार करावा लागतो. पण निनादच्या hobbies काय होत्या, हे तोच काय आम्ही कुणीही सांगू शकतो! क्रिकेट, Music, सिनेमा, नाटक, Cars आणि Journalism! या प्रत्येक field चा त्याचा in-depth अभ्यास असायचा. हा अभ्यास लोकांसमोर मांडताना निनादमधला लेखक जागा व्हायचा आणि मग काय..

वाचकांसाठी ती अगदी ट्रीट असायची! किशोर कुमारचा जन्मदिवस असो किंवा कपिल देवचा. सेहवाग रिटायर होणार असो किंवा गुलझार साहेबांचं केलेलं कौतुक असो.. निनादने त्यांना दिलेले wishes, त्यांना त्याच्या शब्दांनी दिलेली मानवंदना वाचतच राहावी, कधी संपूच नये असं वाटायचं.. आजही निनादच्या Facebook Wall वर जाऊन मला हे पुन्हा पुन्हा वाचता येईल याचा आनंद आहे.

निनाद movies चे reviews सुद्धा खूप सुंदर लिहायचा. बऱ्याचदा लोकं म्हणायची, "तुझा review वाचून आता सिनेमा बघायला जाऊ." किंवा "सिनेमा एवढा आवडला  नाही, पण तुझ्या review ला मात्र  5 stars देतो!" त्याचे हे reviews वाचून 'इंजिनियरिंग' या चुकीच्या profession मध्ये निनाद आला असं आम्हां वाचकांना वाटायचं. मला खात्री आहे, त्याला आणि अमिताला सुद्धा कधी ना कधी असं नक्की वाटून गेलं असेल. आम्ही 'प्रयाणोत्सव' नावाचं नाटक केलं होतं. त्यावर निनादने Facebook वर त्याचा  review लिहिला होता. त्याने दिलेली दाद मला इतकी भावली होती की तो review मी स्क्रिनशॉट घेऊन आयुष्यभर जपून ठेवणार आहे! मला वाटत नाही कुणाची लेखणी इतकी तयार होती की तो निनादपेक्षा चांगल्या शब्दांत आमच्या नाटकाचं परीक्षण लिहू शकला असता. त्या नंतर मला प्रश्न पडला, जर मी निनादच्या जागी असतो आणि आमचे भूतकाळात कधी मतभेद झाले असते तर मी त्याच्याइतकी मला दिलखुलास दाद देऊ शकलो असतो का? कदाचित नाही.. आणि म्हणूनच निनाद वेगळा ठरतो, मोठा ठरतो. निनाद मला सतत प्रोत्साहन देत राहिला, माझ्या कामाचं कौतुक करत राहिला. एकदा मला म्हणाला, "मला multi-dimensional लोकं आवडतात. वेगवेगळ्या क्षेत्रात हातपाय मारणारी. Hobbies असणारी. One dimensional माणसं चिकार असतात. "जन्माला आलो, शिकलो, नोकरी केली, लग्न केलं, मुलं झाली, मोठी झाली,आणि मग आपण म्हातारे झालो.. अशा लोकांशी माझं फार कधी जुळलं नाही." असं तो म्हणाला. निनाद मला multi dimensional समजला हे मला माझं भाग्य वाटतं. पण माझ्याकडे जर ५ dimensions असतील तर निनादकडे ५०० होती, हे मला चांगलंच ठाऊक आहे!



मला गाण्यातलं फारसं कळत नाही. पण निनादने गायलेली गाणी मला ऐकायला आवडतात. बहुतेक  निनादनेसुद्धा गाण्याचं formal असं शिक्षण घेतलं नव्हतं. पण अंगातल्या त्याच creative किड्याने त्याला गायकसुद्धा बनवलं होतं! त्याच्या आवाजातल्या softness मुळे त्याचं गाणं ऐकून खूप शांत वाटतं. त्याचं गाणं थेट जाऊन मनाला भिडतं. भरपूर गायकांचा आणि संगीत दिग्दर्शकांचा त्याने बारकाईने अभ्यास केला होता. त्याने किशोर कुमारबद्दल लिहिलेलं वाचलं की वाटायचं किशोर कुमार त्याचा favorite गायक आहे. मग महम्मद रफींवरचं वाचलं की वाटायचं नाही, कदाचित रफी असेल. त्याचा एक status असा होता की पुढच्या जन्मी जर देवाने तुम्हाला संगीत क्षेत्रातलं कुणीही व्हायचं वरदान दिलं तर तुम्ही कोण व्हाल?

त्यावर निनादचं स्वत:चं उत्तर होतं, शफाकत अमानत अली. तेव्हा मला निनादचा favorite गायक समजला. मी शफाकत अमानत अलीचं फक्त 'मितवा' गाणं ऐकलं होतं. पण निनादचा favorite म्हणजेच नक्कीच तो ग्रेट असणार, असं वाटून मी त्याने गायलेली अजून गाणी ऐकली. पुढचा जन्म माणसाचा मिळाला आणि कुठे शफाकत अमानत अली दिसला तर मी त्याला 'निनाद' म्हणून हाक मारीन! कारण इतक्या चांगल्या माणसाचं देव ऐकणार नाही, असं होणार नाही..

# स्नेहबंध

काही दिवसांपूर्वी त्याला भेटण्याचा योग आला. त्याने मला भेटण्याची इच्छा व्यक्त केली हेसुद्धा मी माझं भाग्य समजतो. त्याच्याशी किंवा अमिताशी बोलताना अजिबात रडायचं नाही असं ठरवलं होतं. पण एका point ला अचानक निनाद म्हणाला, "आता माझा 'प्रयाणोत्सव' सुरु आहे." आणि खळ्ळकन काच फुटावी तसे नकळत अश्रू गालावर ओघळले. निनादला कसलंही व्यसन नव्हतं. दारूच्या थेंबालासुद्धा त्याने कधी स्पर्श केला नव्हता. त्याच्या नात्यात, पूर्वजांना कधी कॅन्सर नव्हता. मग निनादलाच का? याचं उत्तर कुणाकडेच नव्हतं. निनाद त्यावर म्हणाला, "काही नाही रे. एका cell ने एकदा ठरवलं की I want to go crazy.. आणि multiplication चालू झालं! Life फार सिरिअसली नसते घ्यायची. होत असतात अशा गोष्टी.." मृत्यूसारख्या मोठ्या गोष्टीला इतक्या सहजपणे सामोरे जाणारे त्याचे हे शब्द मी कधीच विसरणार नाही..



अमिता आणि निनाद दोघांनी कॅन्सरला जबरदस्त fight दिली. त्यांनी दिलेली fight ऐकून निनाद मला कुरुक्षेत्रातल्या भीष्मासारखा वाटला. कॅन्सरशी युद्ध करताना बाणांच्या वर्षावाने तो शेवटी त्या बाणांच्या गादीवर पडून होता. पण तरी त्याचं fighting spirit, त्याचा sense ऑफ humor हा तितकाच sharp होता. कॅन्सर ने त्याच्या शरीरावर जरी मात केली असली तरी त्याच्या मनाला तो हरवू शकला नाही. भीष्माला इच्छामरण होतं. बहुतेक तसं निनादलाही होतं. संपूर्ण आयुष्य निनाद जितका समरसून जगला, तितक्याच ग्रेसफुली, तितक्याच आत्मविश्वासाने तो मृत्यूला सामोरा गेला असेल, याबद्दल मला खात्री वाटते. निनादच कदाचित यमाला म्हणाला असेल, "ये.. जा घेऊन मला.. तू भी क्या याद करेगा..!"

डेट्रॉईटने सोन्यासारखा माणूस गमावला. अमिता, तन्वी, उर्वी आणि निनादच्या कुटुंबाचं दु:ख तर माझ्या समजण्याच्या पलीकडचं आहे. आता यापुढे.. "मै दो दिन busy क्या रहा, यहां आशा-ताई का birthday निकल गया और आप में से किसी ने एक लब्ज तक नही लिखा उन की याद में ???? कैसे कंजूस fan हो यार ?!" असा स्टेटस पुन्हा कधीच लिहिला जाणार नाही. आणि कुणी लिहिलाच तर त्यापुढे जाऊन सोन्यासारख्या सुंदर शब्दांत त्या कलाकारांचं वर्णन कुणाला करता येणार नाही. निनाद, तुझी खूप आठवण येतीय. तुझ्यासारखं सतत काहीतरी चांगलं करायचा प्रयत्न मी करत राहीन. तुला माझा सलाम..



**सुशांत खोपकर**

# CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991



Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?

If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

**Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412**

**Owned and Operated by the Walvekar Family**

20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.

www.centralhomecare.com

# Manohar Parrikar in BMM 2017



Thanks to Bakul and thanks to Anjali's face to face persuasion as the convener all the way to Delhi, Manohar Parrikar accepted the invitation to be the Chief Guest in BMM 2017 (Bruhan Maharashtra Mandal) in Michigan. All Marathi NRIs and second generation kids appreciated and felt honored and proud to have Parrikar among them, especially because of his reputation of simplicity and integrity. I was given the task to host Parrikar for two days during BMM 2017, including 2.5 hours car travel from Chicago to Grand Rapids, where the convention was being held.




After general chat, his first question to me was "I am here for all of you in BMM2017. Tell me where all I am supposed to be and I will be there." I had seen all kinds of celebrities. But of course, this was different. I told him that you are "required" for inauguration, Granth-Dindi procession, speech as a Chief Guest and IIT Alumni get-together. Three-Day BMM conventions are usually logistical nightmares with 35+ programs, including 5-6 full dramas, musical concerts, dance events, conferences, kids programs and many other things, all happening simultaneously with support from 350+ volunteers. I politely told him that we intend to have all these programs begin on time. What am I supposed to expect? Of course, our inauguration started 6 seconds early, just before 9:00 am and that huge first-time-on-the-street procession with 60+ dhol-tasha and 100+ lezim players started at 7:30 am sharp next day under the leadership of Parrikar. Jet-lag and long travel was completely irrelevant. After inauguration, I offered to take him to VVIP lounge for lunch. Hahaha, of course, we DID NOT go to VVIP lounge. We went to the main area for lunch with all attendees, and stood in the queue merrily chatting with people around him.

I feel overwhelmed! Where are we going to find such people now? We all miss him.

Enjoy this small clip from his inauguration speech in BMM2017 on "Sabudana Khichadi and IIT Hostel elections!!!!!"

https://www.youtube.com/watch?v=HCSjArhJJJ4&feature=share

**- Nitin Anturkar (IIT Bombay, Hostel 5, 1977-82)**

# कमिटी स्पॉटलाईट

# नाटक पहावं करून.......!




'लग्न पहावं करून आणि घर पहावं बांधून' च्या जोडीलाच; नाटक पहावं करून....... असं म्हणायलासुद्धा हरकत नाही! 'नाटक' तेसुद्धा 'महाराष्ट्र मंडळाचं' (बापरे......)
बाकीच्या मंडळांचे 'मानापमान' सारख्या 'नाटकांचे' किस्से ऐकून असलो; तरीही सांगायला खरोखरच आनंद वाटतो की 'आपलं मंडळ', आपली कमिटी या सर्व लोकापवादांना खरोखरच अपवाद आहे!!
नुकत्याच यशस्वीरीत्या सादर केलेल्या ('पार पाडलेल्या' म्हटलं असतं.... पण नाटक 'पडलं' होतं की काय? अशी वाचकांना शंका येऊ शकते) 'अमर फोटो स्टुडिओ' या भारतातून आणलेल्या नाटकाने, 'डेट्रॉईट'च्या खेळात उत्तर अमेरिकेत प्रेक्षकांच्या उपस्थितीचा उच्चांक घडवला.
या यशाचे श्रेय सर्वप्रथम आपल्या उत्साही मार्केटिंग टीमला जाते. ही टीम अगदी स्वयंस्फूर्तीने आणि कल्पकतेने काम करीत असते. कार्यक्रमाच्या आधीपासून फ्लायर्स, फेसबुकवरच्या पोस्ट्स, winky eyes चे फोटो, Instagram Mi-India वरील, तसेच लोकल ग्रोसरी स्टोअर्स मधील जाहिराती या सर्वांनी मिळून लोकांची उत्सुकता शिगेला पोचवली होती आणि advance booking मधेच साडेचारशे तिकीटविक्रीचा आकडा ओलांडला गेला होता.
या सर्व उत्सुकतेने लोकांच्या अपेक्षापण नक्कीच उंचावल्या होत्या, पण त्याचं जराही दडपण न घेता; 'रंगमंच व्यवस्था' बघणाऱ्या टीमने अपेक्षेपेक्षाही सरस कामगिरी करत नेपथ्य, रंगमंच सजावट, दोन सीन्सच्यामधे सराईतपणे 'प्रॉपर्टी' हलवणं, अशी अनेक जबाबदारीची कामं सुरळीतरीत्या पार पाडली. नाटकाचे सादरकर्ते श्री. सुनील बर्वे यांनी न राहवून "डेट्रॉईटच्या प्रयोगातली रंगमंचाची व्यवस्था भारतातल्या व्यावसायिक रंगमंचाच्या तोडीस तोड होती", अशी कौतुकाची शाबासकी 'बॅक-स्टेज' टीमच्या सर्व हरहुन्नरी कार्यकर्त्यांना आवर्जून दिली. याकरता टीमने सर्व प्रॉपर्टी जमा करून बेसमेंटमध्ये हा सेट उभारायची आणि हलवायची प्रॅक्टिस केली, शिवाय तो सर्व सेट U haul ने ड्राईव्ह करून आणला काहीही न मोडता! हे अतिशय कसरतीचे काम आपल्या टीमने पार पाडून flawless execution कसे असावे हे दाखवून दिले. आपली VP मंजिरी जोशी हिने तिच्या ओळखी वापरून; सेट उभारणीसाठी लागणाऱ्या गोष्टी अतिशय माफक किंमतीत मिळवून रंगमंच व्यवस्थेचं 'बजेट' व्यवस्थित आटोक्यात ठेवलं; त्याबद्दल तिचं विशेष कौतुक!
मार्केटिंग टीम, बॅक-स्टेज टीम यांनी केलेल्या प्रचंड मेहेनतीवर 'Cherry On Top' म्हणावं तशी कामगिरी केली आपल्या evergreen 'स्वागत-समिती'ने! चमकदार निळ्या पेहरावात, डोईला मुकुट लावलेल्या या प्रिन्सेसनी अभ्यागतांचं हसतमुखाने स्वागत करत, लोकांना त्यांच्या सीट्स शोधायला मदत करणं, आलेल्या 'सिनिअर्स'ची आस्थेने विचारपूस करणं आदी कामं अतिशय आपुलकीनं केली.
या तीनही टीम्सनी कुठल्याही सूचना, मार्गदर्शन यांची वाट न पाहता; स्वयंप्रेरणेने आपापल्या जबाबदाऱ्या ओळखून एकत्रित संघभावनेने हा कायक्रम अतिशय यशस्वी केला. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच!!

**भारती मेहेंदळे**









**Program Managers:**
**Manjiri Jalukar**
**Prajakta Kulkarni**

## Marketing and Design Team

**Kaustubh Surdi**
Mugdha Karve
Ulka Bhide
Mansi Dahanukar
Kanchan Naik



## Swagat Committee

**Kalpana Kulkarni**
Hema Rachmale
Ulka Bhide
Anu Naik
Angha Kulkarni
Anupama Haldankar
Kashmira Desai

## BackStage:

**Aarti Newalkar**
Kedar Oak
Manoj Patil
Vaishali Mahimkar
Yogesh Aundhkar
Vikrant Patwardhan
Janhavi Patwardhan
Gaurav Aaglave
Sanket Mundhe
Sneha Vipat
Sudneysh Bhokre
Yogesh Tambat
Sagar Khaire
Abhishek
Aniket Naik
Abhijay Kane
Harshad Annigiri
Mansi Dahanukar
Vedanti Pande

# स्नेहबंध

## शब्दकोडे




शब्दकोड्याचं उत्तर अंकात इतरत्र

**उभे शब्द -**

१. न समजणारे
५. एक फूल / फुलाचे नाव
७. नातं किंवा ओळख नसलेली व्यक्ती
१७. प्रथेने चालत आलेले
२७. ॐ xxजी आद्या
३२. हे पहाटे पानांवर दिसते
३३. तुंबळ युद्ध
३५. वाघाचा आवाज
५०. गगन
५८. हलव
६०. धैर्य
७०. गरोदरपणातील अवस्था

**आडवे शब्द -**

१. व्यक्ती
५. पंचगव्य
११. दह्यात पाणी घालून घुसळल्यावर तयार होणारे पेय
१५. सर्वत्र पसरलेली गोष्ट
३१. स्वतः खर्च करणे
३८. रामायणातील राक्षस
४४. पक्षी
५४. गोमंतकीयांना प्रिय असलेली
६०. उसापासून गूळ तयार करतांना होणारी
६४. बाण
६९. लढाई
७८. हेटाळणी

**मेधा उमरजी**




Before you travel the world, call Jaya, your trusted community travel partner!

*Book today!*

1-877-359-5292 | WWW.JAYATRAVEL.COM

JAYA
TRAVEL & TOURS

# दोडका, दुधी, कारली... आणि अमेरिका





तसा तो दोडकाच... खास आवडावा असं काय होतं त्याच्यात? खरखरीत फताडी पाने... त्याची ८-१० भावंडे तर पिवळी पडून गेलेली. या बिया पार विमानातून अवतरल्या म्हणून नवलायचे की, ऑस्टिन-सीडर पार्कच्या येऊ घातलेल्या वसंत ऋतूच्या आधी कधीतरी पुन्हा पडणाऱ्या गारठ्याच्या फसव्या हवामानातून तग धरत पालवू पाहणाऱ्या म्हणून त्याचे कौतुक करायचे? त्रिकोणी-पंचकोनी, मधून पुढे येणारे टोक, असली जेमतेम ३ पाने घेऊन हा एकटा दुकटा दोडका माझ्याकडे टुकूटुकू बघायचा...
त्याला तशी सांगायची रोज, 'लावीन हं, तुला छान बाहेर बागेत'... नाहीतर जरा पाणी घालायला उशीर झाला की गडी मलूल. अखेर लागला मुहूर्त पण नेमका सूर्य महाशयांनी तो आठवडा अशी हजेरी लावली की मानच टाकली याने ३-४ दिवसात. वाऱ्याने तर पार रया जायची काय ती बाकी ठेवली होती. निसर्गाला दोडका वाटला की काय हा? कुरवाळलं त्याला मीच, 'उन्हानं कोकरू सुकलं गं माझं', म्हणत, थोडा जीवात जीव आल्यासारखा भासला तो. तर असा हा दोडका...

तिकडे तू-का-मी करत एकमेकांना धक्काबुक्की करायची काय ती बाकी, अशा एका कुंडीत अर्धी वाटी टाकलेल्या बियांतून मिरचीची रोपे तरारलेली. त्यांना अलगद बाहेर घेतलं. दोन-दोन तीन-तीनच्या गटात त्यांची फौज शिस्तीने उभी केली वाफ्यात. यात सगळी तयारीची कामं माझा तगडा माळी करतो, म्हणजे बागकामातलं फारसं कळत नाही पण कामाला वाघ आहे. मध्यंतरी पुढच्या हिरवळीतले तण साफ करताना कोणी गाडी थांबवून विचारून गेला, "छान वीड काढतोस, किती पैसे घेतोस?"... तर हा म्हणाला, "आत मालकीणबाईंना विचारा"... इतका कामसू आणि आज्ञाधारक माणूस अमेरिकेत कामाला मिळाला कुठून, कसा? हे आता तुम्हीही काय लागतात विचारायला? अहो, तो माळी म्हणजे दुसरं तिसरं कोणी नसून आमचे 'अहो'च... तर अशी आमच्या अहोंची भक्कम मदत असते म्हणून आमचा फुल-भाजी मळा (फुल्ल) फुलत असतो. (बागकामोत्सुक महिलांनी ही टीप घ्यायला हरकत नाही) तर सांगत काय होते की, मिरचीची रोपं नवीन वाफ्यात लावून झाली.

केसांच्या बटात बोटं घालावीत आणि सहज चाळा करत गोल गोल गुंडाळावीत अशा कारल्याच्या बाळवेली बाजूच्या कुंड्यातल्या जास्वंद, गार्डेनिया, जुई, मोगरा आदी झुडपागतांमध्ये गुंतू बघत होत्या, त्यांना अलगद सोडवलं. मिरच्यांच्या बाजूला लावलं त्यांना. या वेलीबाळींना थोडे लाडकोड लागतात हो, आधाराच्या मुंडावळ्यांसोबत गोड दिसतात या पिटुकल्या. एकदा जोम धरला ना की, हिरवा मांडव उभा करतात या परसदारी. हलक्या वाऱ्याच्या झुळूकेबरोबर डुलणारी हिरव्यागार शालूवरती यथावकाश फुलणारी पिवळ्या नाजूक फुलांची वेलबुट्टी... पाहात राहावी जणू!



दुधीची बातच न्यारी. चुरगाळून गुंडाळा करावीत तर चेंडूएवढी होतील अशी भरघोस पाने, एक विशिष्ट उग्र वास. त्याच्या बिया दोन प्रकारच्या. एक बुटकम्मा जेमतेम पाव इंच तर दुसऱ्या इंच दिड इंच लांबीच्या. या लांबड्यांचे अक्षरशः हातभार त्यामानाने दुधीचे लाड फार. पण खुशीत आला की बहर विचारायचा नाही. यांच्यात 'दोडक्याचं काय?' ही लांब दुधी लटकले.

किडीचा उपद्रव फार, सारखे लक्ष ठेवायला लागायचे. स्वतःच्या कडू वासाने किडीला फटकून लावण्यात कारलीबाई वाकबगार. काळजी होती. मग वाटलं, राहू दे याला इकडे मागे भिंतीशी सावलीला, आधी जोम धरू दे मग लावू याला स्वतंत्र, म्हणत खोचला मिरची मागच्या जेमतेम जागेत.

प्रत्येकाची कथा निराळी पण दिवसामाजी कलेकलेने वाढणारी. एके दिवशी नाष्टा करतो तिथे जेवायच्या बाजूच्या खिडकीत सकाळच्या कोवळ्या किरणांसोबत कोणीतरी डोकावून बघत होतं... नीट पाहिलं तर आपला दोडकुल्या! अगं बाई, योगायोगाने पडलेल्या मागच्या दोन पावसात तरारून नवसंजीवनीच घेऊन आला की, म्हणता म्हणता ३-४ फूट वर! किती काय सांगू अन् काय बोलू असं झालेलं त्याला त्या दिवशी. त्याचा उत्साह पाहून मग आम्ही मांडव घातला त्याच्यासाठी. 'बहरेन मी याच प्रेमासाठी' अस्सा फोफावला मग बाजूच्या ५-६ कारलींच्या तोडीसतोड हा लाडका दोडका!

दंगाच केला या एकूण सडपातळ वर्गीय भाज्यांनी. चार-पाच महिन्यात ३०० अधिक कारली, ८० पेक्षा जास्त दोडकी, २५ एक लांब पोसलेले दुधी असा भरगच्च भाजीमाल पिकला. अमेरिकेत आपल्याकडच्या भाज्या फारशा मिळत नाहीत म्हणून तक्रारीला वाव राहिला नाही. हृदयात शिरण्याचा मार्ग पोटातून जातो तसंच घरी पिकवलेल्या भाज्यांचा विषय अंतिमतः पाककलेतून फळफळतो. दोडक्याची भाजी, आणि काढलेल्या सालांची कोरडी चटणी, किती ती करायची? मग लागला शोध... दोडक्याची खीर! पूर्ण साले काढलेली दोडकी (Ridge Gourd Flesh), थोड्या काजूपाकळ्या, कपभर दुधात घालून कुकरमधून मऊ वाफवून घ्यायचं. शिजल्यावर एकजीव वाटून त्यात वेलची, केशर, सुकामेवा घालायचा की बासुंदीच्या तोडीची चविष्ट सुंदर खीर तयार... आणि त्या दोडक्याच्या काढलेल्या सालांबरोबर तासभर भिजवलेले तांदूळ-उडीद डाळ-जिरं-मिरची वाटून घेतले की त्याचे झटपट कुरकुरीत डोसे! आहे की नाही फक्कड बेत!!

चिंचगूळ घालून वा परतून अशा कारल्याच्या भाज्या, त्यासोबत घातला घाट मग कारलं-मिरची लोणच्याचा, आणि सुक्या खोबऱ्यासोबत किसलेल्या कारल्याची परतून केलेल्या खमंग चटणीचा. सकाळी कधी दुधीचा पुदिना घालून ताजा रस तर कधी केवळ कडू जहर कारल्याचा, असा चाललेला देशी भाज्यायुक्त आरोग्यवर्धक कार्यक्रम, विचारांच्या गाडीवरून अमेरिकन जेवणाशी येऊन ठेपला. एरवी ब्रोकोली, बीन्स, कॅरट, बेल पेपर, कॉर्न, पीज, झुकिनी, ॲस्पॅरगस्, मशरूमस्, बांबू, स्पिनॅच, केल, बोकचॉय इत्यादी भाज्यांत रेंगाळणारा अमेरिकन भाजी बाजार आपण आपनावलेला आहेच. त्यासोबत दोडकी-दुधी-कारली (आणि आणखीही आपल्याकडच्या भाज्या) असा व्यापित करायचा झाला आणि फायबरची मक्तेदारी ही त्या निःसत्व ओट्स नि तत्सम चवहीन काही धान्यांभोवती गुंतून पडलेली न राहता या भाज्यांच्या रूपाने सत्वरूप पुरवली गेली तर?



बागेत इतक्या भाज्या पिकून आणि त्यातल्या अनेक माझ्या अमेरिकन शेजारणीच्या बाजूला कुंपणावरून लटकूनही तिला यातले तिच्या स्वयंपाकात काय उपयोगी पडेल हा तिला आणि मलाही प्रश्नच पडला होता. तेव्हा मग विचार आला, थंडीतही निष्ठेने बर्फाळ पाणी पिणारे अमेरिकन लोक बाहेर बर्फ पडत असतानाही आईसक्रीम सहज म्हणून खातात. त्यात एखादे (fiber rich) Ridge Gourd Ice cream वा pudding कसे वाटेल? किंवा Ridge Gourd peel savory crispy pancake म्हणून आपला दोडक्याच्या सालींचा डोसा? कोलेस्ट्रेरॉल कमी करण्यापासून ते अनेक फायदे देणारा सकाळचा Fresh bottle gourd juice with mint and lemon, अथवा Bottle gourd soup आणि तसाच एखादा Bitter gourd scrape (कारली) bread किंवा pizza? मोटप्याने त्रस्त अमेरिकन जनतेला या सडपातळ भाज्या रोजच्या खाण्यात वापरल्याने उपयुक्त ठरल्या तर?

टेक्ससमध्ये सुदैवाने बर्फ आणि एकूण हिवाळा तसा कमी. त्यामुळे बागकामाला, प्रयोग करायला अधिक वाव. मध्यंतरी अशाच तुरीच्या बिया पेरल्या आणि चक्क त्याचे झाड १०-१२ फूट वाढले. अगदी पिटुकल्या शेंगा लागल्या तेव्हा क्वचित पडणारा डिसेंबर सुरुवातीचा बर्फ पडला आणि गारठून झाडं गेली. नाहीतर एडमामे सारख्याच कोवळ्या तुरीच्या हिरव्या शेंगा मिठाबरोबर उकडून सोलून खायला मस्त लागतात. मात्र इथे बागेचा प्रत्येक प्रयोग तसा वेळखाऊ असतो कारण तो वार्षिक ठरतो, पण डोक्याला, कल्पनाविस्ताराला (आणि पिकून आल्यास पोटालाही) खाद्य पुरवतो. आपल्याकडच्या औषधी, गुणकारी अगदी उदाहरणच घ्यायचे झाले तर हळदीचेही पेटंट भारताबाहेरच्या लोकांनी घेण्याचे प्रयत्न झाल्याचे आपल्याला माहिती आहे. त्या चढाओढी पलिकडे, ज्या भारतीय भाज्या, वनस्पतींचे गुण माणसास कल्याणकारी आहेत हे बघून ते अमेरिकन जीवन पद्धतीतही खास पर्यायाने उतरवण्याचा प्रयत्न करता आला तर? याच वैचारिक धरतीवर मांडलेली 'दोडका, दुधी, कारली... आणि अमेरिका'ची सहज सुचलेली ही (अफलातून) कल्पना. आता यावर पेटंट वगैरे घेऊन काम करावे का? गंमतीचा भाग सोडता, येणाऱ्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कडुलिंबाची पाने, रस घातलेला एखादा टेस्टी फ्रुट पंच कसा वाटतो? सध्या माझ्या ग्रीन हाऊस मधली कडुलिंबाची रोपे लहान आहेत, ती व्यवस्थित मोठी झाली की तो ही विचार करूया, काय...?

मराठी नववर्षाच्या हरितरसगुणयुक्त सदाबहार शुभेच्छा!

**सायली मोकाटे-जोग**
**सीडर पार्क, टेक्सस**

shilp
ENTERTAINMENT

# केळकरांची सुप्रिया!



"पण तू लढत का नाहीस मोहन, हे सहन का करतोस?" समोरून येण्याऱ्या छोट्या कुत्र्याची वाट बघत अंजली म्हणते.
"अंजली, हा कुत्रा तुझ्याकडून किती लाड करून घेतोय. त्याला तुझ्याजवळ उभं राहायचं स्वातंत्र्य आहे, पण मला तुझ्या जवळच काय तर सावलीतही उभं राहायची देखील परवानगी नाही, लढणं तर सोडच "

हा संवाद घडतो १९४३-४४च्या दरम्यान, सुप्रिया केळकरच्या 'अहिंसा' या पुस्तकात. अंजली ही पांढरपेशा समाजातील वर्गातील ११ वर्षाची एक सुजाण व सहृदय मुलगी. तर मोहन... मोहन १४ वर्षाचा दलित समाजातील हुशार मुलगा. गांधीजींच्या 'चले जाव' चळवळीच्या पार्श्वभूमीवर ही कथा घडते. स्वातंत्र्यलढ्यात अनेक बळी गेले, मानवी मूल्यं कसाला लागली, हिंदू मुस्लिम, उच्च-नीच जाती, भारतीय विरुद्ध इंग्रज ...शत्रू कोण, मित्र कोण हे न कळून अनेकांची आयुष्यं होरपळली गेली. त्यापैकी २ कुटुंबं म्हणजे अंजली व मोहनची. इतिहासावरची पुस्तकं वाचून, त्या काळातील लोकांच्या मुलाखती घेऊन, कदाचित सत्याला सामोरं नाहीतर जवळ जाणारं पुस्तक वेळप्रसंगी लिहिता येईल; परंतू "उच्चवर्णीय" मुलीच्या मनातलं द्वंद्व, घालमेल, "हरिजन" मुलाला तिच्याशी बोलताना वाटलेली भीती हे सर्व १० ते १३ वर्षाच्या मुलांना समजेल, आवडेल आणि पचेल अशा भाषेत (इंग्लिशमध्ये) लिहिणारी व्यक्ती तितकीच प्रगल्भ आणि विचारी हवी.

'आपल्या (मंडळातल्या) सुभाषकाका केळकरांची मुलगी' याव्यतिरिक्त मला सुप्रियाची काहीही माहिती नव्हती. तिच्या पुस्तकाचे नाव कळले, आणि ते इथल्या ग्रंथसंग्रहालयात मिळते हेही कळले म्हणून मी लायब्ररीत गेले. ग्रंथपालिकाबाईंनी 'काय शोधत आहेस?' विचारलं; मी सुरू केलं "S U P R ...तिने मला मध्येच थांबवून विचारलं "Oh you mean Supriya Khelkaar? She spoke here once. Great book, loved her talk!" या लेखाची नांदी झाली ती अशी! गोऱ्या लोकांचा शिक्का मिळाला म्हणजे चांगलं असं नाही; परंतू फक्त भारतीयांच्यातच हे पुस्तक पिंगा घालतंय असं नाही तर!

शाळेत असताना एक चारोळी वाचनात आली होती:




"इतिहासाचे अवजड बोजे
डोक्यावर घेऊन न नाचा
करा पदस्थल त्याचे आणिक
चढूनि त्यावर भविष्य वाचा "

सद्य परिस्थितीत तर त्या ओळींचे महत्व अधिकच पटते. सुप्रियाशी बोलताना तिची इतिहासाविषयीची ओढ मला या ओळींची आठवण करून देत होती.

वरवर पाहिलं तर १०-१४ वयाच्या मुलांना डोळ्यासमोर ठेवून लिहिल्याने मी ते (एका नाही तरी दोन) बैठकीत वाचून काढलं. कथा व भाषा दोन्ही ओघवत्या आहेत. विषय कठीण असला तरी वाचन सोपं झालं. लेखिका एका बैठकीत पुस्तकाचं एक प्रकरण पूर्ण करते अशी आपली एक मोहक व भ्रामक कल्पना असते. प्रत्यक्षात एकाच प्रकरणाची १० पारायणं आणि ती फेकून देऊन पुन्हा नव्याने लिहावं लागतं. याचा कडेलोट म्हणजे सुप्रियाचा अनुभव! 'अहिंसा'चा पहिला मसुदा तिने २००३ मध्ये लिहिला. पुस्तक पूर्णतः जन्माला यायला २०१६ साल उजाडलं!

"अगं, मग मधल्या काळात केलंस काय?“
"विधू विनोद चोप्रा बरोबर लेखन केलं"! मी अवाक!! मिशिगनमध्ये जन्मून वाढलेली ही मुलगी मला काय उत्तर देते हे?

“तुला मोठेपणी कोण व्हायचंय”? हा प्रश्न मुलांना विचारून बघा (भारतीय आईवडलांना अभिप्रेत असलेलं "डॉक्टर" हे उत्तर सोडून); काहीही ऐकायला मिळेल. चित्रपटात काम करायचे, अग्निशामक दलात काम करणे, शाळेत शिकवणे, रॉक स्टार, गिटारिस्ट वगैरे वगैरे... सुप्रियाला मात्र हिंदी चित्रपटांचे इतके वेड होते की नटनट्याच्या पोस्टर्सनी तिची भिंत भरून (खरी, फेसबुकची नव्हे!) गेली होती. चित्रपट बघत ती हिंदी तर शिकलीच पण वेगळा परकायाप्रवेश करून ती पटकथा लिहायची स्वप्नं पाहू लागली. ही निव्वळ चाकोरीबाहेरची महत्वाकांक्षा आहे असं नाही तर सहजी पूर्ण होईल अशीही नाही. आणि पाचवीत जी स्वप्नं बघतो ती कॉलेजला पोचेपर्यंत टक्केटोणपे खाऊन पुसली गेलेली असतात. विशेष म्हणजे हा मनोदय तिने घरी बोलून दाखवला, होकार-नकार काय मिळेल तिला कल्पना नव्हती; प्रत्यक्षात मिळालं ते कोणालाही माहित नसलेलं एक कटू सत्य! तिच्या वडिलांनीही (सुभाषकाका) पूर्वी हा प्रयत्न केला होता, एका हिंदी चित्रपटासाठी बरेच लेखन केले होते, अपयशाची तयारी होती; पण झाला तो विश्वासघात. त्या क्षेत्रातला अन्याय, राजकारण त्यांनी स्वत: अनुभवल्यामुळे आपल्या मुलीच्या नशिबी ते यावं हे त्यांना मुळीच नको होतं. सुप्रिया मात्र स्वप्नांशी ठाम होती. हे नुसतंच स्वप्न होतं असं नाही, लेखन हा तिचा स्थायीभाव आहे. सहावी सातवीत असल्यापासून ती लिहायला लागली होती. जसजसे वाचन समृद्ध होत होते तश्याच सामाजिक जाणिवा देखील. अमेरिकेत ३० वर्षांपूर्वीची लहान मुलांसाठी लिहिलेली पुस्तकं पाहता एक जाणवतं, की कथानायक फक्त गौरवर्णीय. क्वचित कृष्णवर्णीय; परंतु इतर वर्णियांच्या कथा-व्यथा (किंवा आनंदही) कुठेच व्यक्त झाल्याचे दिसत नाही. तोही किडा तिच्या डोक्यात वळवळत होता. (तो किडा पुढे येतोच आहे.)

यथावकाश film व मानसशास्त्र हे दोन्ही (एकमेकांस पूरक!) विषय शिकून तिने पदवी-शिक्षण पूर्ण केले आणि लेखनाचे प्रशिक्षण मिळवून विधू विनोद चोप्रांशी संपर्क साधला आणि the rest is history! ‘एकलव्य’, ‘लगे राहो मुन्नाभाई’ या गाजलेल्या चित्रपटांच्या पटकथाकारांच्या पंक्तीत तिचे नाव जाऊन बसले. ‘लगे राहो मुन्नाभाई’ चित्रपट भारतात आणि अमेरिकेत blockbuster म्हणून खूप गाजला, तर नाचगाण्यांनी गाजलेल्या बॉलिवूड संस्कृतीत जेमतेम अर्धं गाणं असलेला, शेक्सपिरियन चित्रपट असा 'एकलव्य' खूप वेगळ्या धर्तीचा होता. चित्रपटाच्या कथेसाठी लेखकांचा चमू असतो, त्या चमूबरोबर काम करताना लेखनाचे धडे गिरवले गेले. त्याकाळात ती अमेरिका ते भारत असा प्रवास अनेकदा करायची.

एकीकडे ते लेखन, तर दुसरीकडे मुलांसाठी पुस्तक लिहायचा मानस होताच.

तिच्याशी बोलताना मला भारतीयपणाचं एक वेगळच रूप जाणवत होतं. मराठी मंडळात कार्यक्रमांना २५ ते ८५ वयाचा - ६ दशकं व्यापलेला - समाज भेटतो. प्रत्येकाच्या मनात महाराष्ट्राचं, मराठीपणाचं एक चित्र असतं; पण गप्पा मारल्या की कळतं की कुठलीच २ चित्रं सारखी नसतात. ही भारतात जन्मलेल्यांची तऱ्हा तर इथे जन्मलेल्यांच्या मनातली चित्रं तर आणखीच वेगळी असणार. घरी भारतीय वातावरण तर शाळेत अमेरिकन; ही तारेवरची कसरत तिने कशी जमवली असेल? मिशिगनमधल्या बहुतांशी गौरवर्णीय लोकांच्या शाळेत आणि वस्तीत राहून स्वत्व जपायचे कठीणच, तिच्या संवेदनशील मनाने ही तफावत, वर्णभेद हे सर्व टिपले असणार. पण त्या सर्व वातावरणात गांधींची चळवळ कुठे बसेना.

"सध्याच्या पिढीसाठी लिहायचे सोडून तू या विषयाकडे कशी वळलीस?"

"ती कथा वेगळी! मी गुजराथेत माझ्या वडलांच्या गावी जायचे त्या वातावरणातून 'अंजली' ही कथानायिका जन्माला आली पण गोष्टीचं कारण म्हणजे माझी पणजी (आईची आजी)! १९३८च्या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाली. गांधीजींच्या चळवळीला तिने आपले आयुष्य वाहून घेतले. त्याविषयी तिने एक छोटसं पुस्तकही लिहिलं पण मला मराठी वाचता येत नाही, त्याचं इंग्रजीत भाषांतर होइपर्यंत मला तिच्या जीवनात डोकावून बघता येईना. तो विषय बरेच दिवस डोक्यात घोळत होता. गुजराथेत काही जुन्या घरांवर पुसट झालेलं अक्षर Q (for Quit India) दिसत होतं, ते सर्व या पुस्तकात एकरूप झालं. "

'अहिंसा' या पुस्तकाला बरीच पारितोषिकं मिळाली. भारतात आणि इथेही. त्यामानाने इथल्या भारतीय समाजाने पुस्तकाची फारशी दखल घेतली नाही. इथे जन्मलेल्या मुलांना 'आलेले' भारतीय बरेचदा कुत्सितपणे ABCD (America Born Confused Desi) म्हणत, मला हे confusion तिच्यात कुठेच आढळले नाही. दोन दगडांवर लीलया पाय ठेवून ती एक लेखिका, आई, पत्नी, मुलगी आणि नागरिक या भूमिका जगत आहे. इथे वाढणाऱ्या भारतीय मुलांसाठी तिची ३ पुस्तकं येऊ घातली आहेत, एक येत्या सप्टेंबरात दोन  पुढच्या वर्षी. एका पुस्तकासाठी तिने १८५७ सालचे बंड निवडले आहे.

स्त्रीमुक्ती, संघर्ष, वर्णभेद, समता हे  कुठलेही (सध्या तोंडी लावून चघळले जाणारे) शब्द न वापरता ती तिची मनोधारणा शांतपणे सांगत होती; आपण काही वेगळे करतो आहोत हे सांगण्याचा अट्टाहास नव्हता; तरीही तिची कळकळ जाणवत होती... भूतकाळाशी तिचे, समाजाचे, भारतीयांचे दृढ नाते बोलण्यातून उलगडत जात होते.
शेवटी  'कोऽहम्, कुतो आयात:' हे कळल्याशिवाय, आपण पुढे जाऊ शकत नाही; हेच खरे!

**(अधिक माहितीसाठी www.supriyakelkar.com)**

**मुलाखत व शब्दांकन:**
**ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**



With Best Compliments
from

# Gangadhar
# and
# Pushpa
# Vaishampayan

# स्नेहबंध

## Me_मराठी My_मराठी

इंग्रजीत तोंडाला म्हणतात face
मराठीत तोंडाला आणतात फेस

कोर्ट-कचेऱ्यात लावतात case
कोर्टाच्या वाऱ्यांत जातात केस

समजलं नाही, इंग्रजीत डोकं shake
दुखलं तर मात्र, मराठीत डोकं शेक

इंग्रजीत खोट्याला म्हणतात fake
मराठीत म्हणतात मारू नको फेक

माझं म्हणणं मान, जर असशील नेक
उगा नंदीबैलागत, हलवू नकोस neck

कधी गणितातला Pi, कधी खायची pie
कधी गरीब गाय, कधी एकदम कुल guy

विस्तीर्ण जलाशय, त्याला म्हणती lake
मधोमध जमीन, त्याला म्हणतात बेट
डोळा आणते पाणी, दूर गेलेली लेक
खरं नाही वाटत? लावता का bet??

डोकं झालंय jam, म्हणतो खुर्ची take
दमलो आता जाम, म्हणून बुड जरा टेक

**- संजय मेहेंदळे**



# सप्तसुरन के भेद सुनाये



जानेवारी '९४. नव्यानेच कामाला लागलो होतो. त्यामुळे महिन्याचा पगार झाला की खरेदीचा उत्साह असायचा. त्यातली एक महत्वाची खरेदी म्हणजे गाण्याच्या कॅसेट घेणं. असाच एका संध्याकाळी, पुण्याच्या गरवारे पुलाजवळील एक छोट्याश्या दुकानात कॅसेट्स चाळत होतो. तिथल्या टेपवर काहीतरी लागलेलं होतं त्याकडे माझं फारसं लक्ष नव्हतं. माझ्याच तंद्रीत असूनदेखील डोळयांच्या कोनातून मला काहीतरी घडताना दिसलं. एक जोडपं दुकानासमोरून गेलं, आठ दहा पावलं जातो न जातो तोच दोघे एकदम थांबले आणि मागे वळून दुकानापाशी आले. मग टेपवर काय लागलंय याची आतुरतेनं चौकशी करून, ती कॅसेट लगेच विकत घेऊन, दोघे एखादा खजिना मिळाल्याच्या आनंदात निघून गेले.

इतका वेळ लक्ष न देणारा मी, मग कान देऊन जे काही वाजत होतं ते ऐकायला लागलो आणि ते आवडलं सुद्धा. किशोरी अमोणकर यांचा ‘हंसध्वनी’ रागातला एक तराणा होता तो! ही ताईंच्या गाण्याशी माझी पहिली भेट. अर्थात ती कॅसेट मी विकत घेतली, ऐकून त्याची पारायणं केली खरी, पण शास्त्रीय संगीतातलं काडीमात्र ज्ञान त्यावेळी मला नव्हतं. आणखी किमान दहा वर्षं तरी जावी लागली ‘राग’ म्हणजे काय, तो कसा ओळखावा, त्यातले स्वर कोणते हा सर्व बोध व्हायला. हा बोध होण्याकरिता जो शोध घेतला, त्यात कितीतरी गायक आणि वादकांचे शास्त्रीय संगीतातले निरनिराळे प्रकार मी पुन्हा पुन्हा ऐकले, अजूनही ऐकतो. पण फिरून फिरून माझ्या मनाला भावतं ते किशोरीताईंचं गाणं!

‘किशोरी अमोणकर’ या नावाला हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात तेच मानाचं, आदराचं स्थान आहे जे कदाचित सचिन तेंडूलकरला क्रिकेटच्या खेळात आहे (कुणालाही सहज लक्षात येईल म्हणून हा संदर्भ). त्यांच्याबद्दल, त्यांच्या गाण्याबद्दल खूप काही लिहिले गेले आहे, ते इथे बरळण्याचा माझा हेतू नाही. स्वतंत्रपणे त्यावर भाष्य करावे इतकी माझी खचितच पात्रता नाही. मी मांडतोय ते फक्त मला त्यांच्या गाण्याने येते ती अनुभूती, आणि त्याचं काहीसं विश्लेषण.

बरेचसे मोठमोठे गायक आपल्या गायकीची करामत दाखवण्याच्या मोहाला बळी पडतात. लांबलचक ताना घ्या, खर्ज लावून मंद्र सप्तकात भटकंती करा, एखादा स्वर घेऊन एका सप्तकातून दुसऱ्या सप्तकात उडी घ्या, श्रोत्यांनी एकदा तिय्या घेताना दाद दिली कि पुन्हा पुन्हा तिय्या घ्या, तबलेबुवाशी जुगलबंदी करा असले नाना प्रकार चालतात. अर्थात श्रोतेही याला तितकेच जबाबदार आहेत. तर नवीन गायक गुरुचं अनुकरण करण्यापलीकडे फारसं काही नवीन दाखवत नाहीत. अगदी ठरलेले ३-४ राग पाठ केल्यासारखे आळीपाळीने गायचे हेही चालतं. अर्थात या सगळ्याला अपवाद आहेतच.



किशोरीताईंचं गाणं मला यातून हमखास वेगळं वाटतं. एखाद्या प्राचीन मंदिराच्या गाभाऱ्यात, मंत्रोच्चाराच्या घुमत्या नादस्वरात, शिवलिंगावर अभिषेक होत राहावा तसा हा अनुभव. सुरुवातीला स्वरमंडलाचे स्वर ऐकू येतात तिथेच याचा आरंभ होतो. मग आलाप, बंदिशीचे बोल यातून रागाचा विस्तार मंदगतीने सुरु होतो. तो सतत पुढे जात राहतो, पण एखाद्या निसर्गरम्य प्रदेशातून एक आगगाडी धीम्या गतीने जात राहावी आणि आपण आजूबाजूच्या सृष्टीचे मुक्तपणे दर्शन घेत राहावे, तसा काहीसा हा अनुभव

# स्नेहबंध



. स्वरसंगतींचा निरनिराळा अविष्कार आपल्यापुढे उलगडत राहतो पण कुठेही घाई नाही, अनावश्यक हरकती नाहीत. केवळ असीम रसनिष्पत्ती यातून होत राहते. आणि मग पावसाच्या एका थेंबाने जन्म घेणारा धबधबा, त्याच्या वाढत्या जोराने बळ धरून, शेवटी एखाद्या कड्यावरून झेपावा तसा द्रुत मार्गाने जाऊन तो राग आपला परमोच्च क्षण गाठतो. श्रोत्याची चिंब भिजूनही तृषित राहावे अशी अवस्था होते!
मी मांडलेला हा अनुभव काहीसा स्वप्नाळू, रोमांचकारी असेल पण प्रत्येकदा ताईंचं गाणं ऐकताना मला असाच काहीसा आभास होतो. मग त्यांचा 'गौड मल्हार' ऐकताना एखाद्या ढगावर बसून डोंगर दऱ्यांवरुन स्वैर फिरल्याची जाणीव होते, 'अहिर भैरव', 'रागेश्री' ऐकताना 'रसिया म्हारा' किंवा 'पलक न लागी' म्हणणाऱ्या विरहिणीच्या व्यथेशी मी एकरूप होतो. 'मीरा मल्हार' मधील 'तुम घन से घनश्याम' ऐकताना मनाची एक अद्‌भुत, निरामय, शांत अवस्था होते, मीराबाईंची कृष्णभक्तीत व्हावी तशी. तर 'शुद्ध कल्याण' किंवा 'भूप' हा निव्वळ मुक्तानंदाचा अनुभव देतात. असे एकाहून एक सरस रागाविष्कार - यमन, विभास, भिन्न-षडज, संपूर्ण मालकौंस, भीमपलास, बागेश्री, देसकार, ...... मनाला हवं तेव्हा हवा असेल तो भाव निवडावा आणि मोक्ष गाठावा.

मी जे वर सांगितलं तो ‘एक रसिक श्रोता, त्यांच्या गाण्याचा भोक्ता’ या भूमिकेतून घेतलेला अनुभव. पण मग ताईंच्या मुलाखतीतून, लेखातून त्यांचे संगीतातील 'रस' आणि 'भाव' या विषयावरचे विचार ऐकले की जाणवतं त्यांनी याचा सखोल अभ्यास करून ते आपल्या गायनात प्रत्यक्षात कसं आणलंय ते. केवळ परंपरागत वारसा म्हणून आलेलं स्वीकारावं आणि श्रोत्यांसमोर मांडावं यावर समाधान न मानता, श्रोत्यांच्या हृदयापर्यंत ते संगीत पोचावं, त्या स्वरांशी स्वतः आणि श्रोते एकरूप व्हावेत हा ताईंचा प्रयत्न एका कलावंताचं श्रेष्ठत्व दाखवतं. त्यांच्याच शब्दात सांगायचं तर "I want to plunge into the essence of the Swaras. The most important thing is the value of the sound. Explore it! Every feeling has its inherent rhythm. Find it!” आणि मग त्यांच्या आवडत्या भूप रागातल्या, त्यांनीच रचलेल्या आणि सुरात बांधलेल्या शब्दांचा अर्थ उमगतो

**सहेला रे, आ मिल गाये,**
**सप्तसुरन के भेद सुनाये**
**जनम जनम को संग न भुले,**
**अब के मिले सो बिछुडा न जाये**

मी स्वतःला भाग्यवान समजतो की या जन्मी किशोरीताईंच्या गाण्याशी माझं सख्य जुळलं. आणि हीच प्रार्थना करतो की प्रत्येक जन्मी मला हाच अनुभव यावा, हे सख्य कधीही न तुटावं.

**सुरेश नायर**

# With Best Compliments
# from
# Shri &
# Shashi
# Thanedar





# माझी डाएट गाथा

तशी मी जन्मलेले चांगली साडे नऊ पौंडांची (असं आई नेहमी लहानपणापासून सांगत आलेली), "जुनी" मंडळी घरी आली की म्हणायची, "काय "गटलू" होती तू बाळ असताना!", "कसले गालगुच्चे घ्यायचो तुझे!" वगैरे वगैरे..

शाळा कॉलेजात मग 'जगभराचे ओझे आपल्यालाच वागवायचे आहे ' या थाटात आणि घरातून, "मुली असल्या तरी काय झाले अगदी सगळी मुलांचीही कामे करतात" असे अभिमानाने (तेव्हा वाटायचे ) ऐकत असल्याने "चिंता करिते विश्वाची" अशी मी "टेन्शन ताई" झाले. त्यामुळे अर्थातच लहानपणीचे बाळसे वगैरे केव्हाच गळून पडले.

कारणे अनेक असोत पण अंगाने गबदूल असलेली शाळेतली मूर्ती कॉलेजात व त्यापुढे लग्न होऊन पहिलं मूल होईपर्यंत डाएट बिएट करून वजन कमी करण्याची गरज पडेल या विचारांना हास्यास्पद मानायची. बाळसे धरलेय, आणि आपण आता "खाते पिते घरकी" कॅटेगरीत मोडतो हे कळायला वयाची ३५ शी उलटली. निमित्त झाले ते महाराष्ट्र मंडळाच्या नाटकात काम करण्याच्या संधी मुळे.



लहानपणी माझा एक चुलत भाऊ आणि मी फार भांडत असू. वादात हरायला लागला की मला चिडवायला म्हणत असे, "मायडे, तुझ्याकडे फार skills आहेत पण त्यांना इथे scope नाही, तुला "झीम-बाँबे" ला जायला हवे. (तेव्हाची झिम्बाब्वे ची क्रिकेट टीम हा विनोदाचा विषय होता हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आलेच असेल :)

नशिबाने "झीम-बाँबे" ला नाही पण नवऱ्याबरोबर अमेरिकेत आले. मग इथे आल्यावर शिक्षणाचा उपयोग झालाच पाहिजे या हट्टाने आणि आधी पैसे कमावण्यासाठी आणि मग सवय म्हणून नोकरी सुरु झाली, मुलं झाली वगैरे.. आयुष्य सुरु झाले, सगळे व्यवस्थित सेटल्ड झाले की माणसाला अजून काहीतरी हवं असतं. नशीब, इथं पूर्वी आलेल्या मराठी मंडळींनी "मराठी मंडळं" काढून चांगली सोय करून ठेवलीये.

तर मंडळाच्या एका प्रयोगाच्या practice ला नाटकाच्या प्रॉम्प्टर चे काम करताना डायरेक्टर काकांना माझी शब्दफेक आवडली. काकांनी लगेच मला पुढील नाटकात "साइन" करून टाकले. :). हौशी कलाकारांना घेऊन नाटके बसवण्याची मोठीच कसरत सुभाष काका गेली अनेक वर्षे यशस्वी रित्या करत आलेत. तर नाटकात काम करायला मिळणे ते ही मुख्य पात्राचे, २५ वर्षांच्या मुलीचे! जबरी! नाही का? आता मी ३५ शी त २५ वर्षांची कशी दिसू? नशिबाने वडिलोपार्जित 'जीन्स' मुळे लहान दिसे पण २ मुलांनंतर, मुख्यत्वे ४ महिन्यांची बाळंतीण (बाळंतपण चांगलेच मानवलेले!) पोट कसे आत जाणार लगेच? शोभणार का मी? काका बिनधास्त होते आणि मंडळाचा audience पण फार समंजस. पण म्हणून काय झाले? मीच मग थोडे मनावर घ्यायचे ठरवले, की जरा डाएट बिएट काही बघू या.

मग मी "ॲक्टिंग" च्या प्रॅक्टिस पेक्षा "डाएटिंग" वर जास्त मेहेनत घेऊ लागले. काकांनी, नुकतेच प्रसिद्ध झालेले ऋजुता दिवेकराचे, साक्षात झीरो फिगर करीना कपूर ने appreciate केलेले "लूज युअर वेट, डोन्ट लूज युअर माईंड " हे पुस्तक सुचवले. मी म्हटले बघुयात तरी.

तोवर मला डाएट- बिएट करणारी एक वेगळीच जमात असते असे वाटत असे. केवढा अभ्यास असतो त्यांचा...
पण अरेच्च्या! , काय सॉलिड feeling आले पुस्तक वाचून! त्याहीपेक्षा कसलं भारी, पटेल असेच नैसर्गिक लिहिलेय पुस्तक. आपली संस्कृती, मायदेशापासून दूर असले की फार आठवते ती, पद्धती, यांच्याशी निगडित गोष्टी त्यात असल्याने फारच भावले ! मला गोळा बेरीज कळले की, 'क्या बात है'! ऋजुता ने सांगितलेय की फक्त रोज ४ च गोष्टी करायच्या:

१. सकाळी चहा नाही पण एखादे फळ खायचे.
२. व्यायाम रोज कमीत कमी १ तास. (कार्डिओ आणि योगा )
३. दर २ तासांनी मुठीत मावेल इतकेच खायचे, काहीही खाल्ले तरी चालेल! ("काहीही" फार आवडले!! माझ्या आळशीपणाच्या पथ्यावरच डाएट की! )
४. झोपण्याआधी २ तास काहीही खायचे नाही.

'आयला किती सोप्पंय!' वाटले आणि सुरु झाले. काही काही जण काय उगाच बाऊ करतात नाई ?, केव्हढा अभ्यास !... म्हणे नुसते प्रोटिन्स खावे , low carb खावेत, अमुक चा glycemic index किती, तमुक मध्ये bad fats किती वगैरे..बापरे बाप! नकोच असले डिटेल्स, ते ही खाण्याच्या बाबतीत छे! उगाच काय ते कॅलरीज बघणे आणि प्रत्येक पदार्थाला categorizedकरणे?
हे एकदम सोप्पंय! नुसत्या ४ स्टेप्स पाळल्या की झाले.
मग रोज आठवणीने सकाळचे फळ, त्यानंतर बरोब्बर २, २ तासांनी अगदी अलार्म लावून मूठभर दाणे, गुळ, तिखट मीठ लावून मोड आलेली मटकी, २ पोळ्या, वाटीभर भात असे सर्वांग जेवण पण २-२ तासांच्या अंतराने खाऊ लागले.
पहिला १ आठवडा भलतीच तारांबळ उडाली पण brutally honest होते. नाटकात १० वर्षे तरुण दिसायचं हे motivation होते, मग काय नाटकाची टीम, घरचे, मित्र-मैत्रिणी, सगळेच positively मदत करू लागले. नवरा तर चक्क दर २ तासांनी मला ऑफिस मध्ये फोन करून विचारत असे की, "खाल्लंस?" अहाहा! किती मी भाग्यशाली! रोज वजन काट्यावर चढून खूष ही होऊ लागले.



१५ एक दिवस अगदी सक्तीने केले. पण या २ - २ तासांच्या चक्रां मध्ये मी माझे घर, मुले, ऑफिस, नाटक या सगळ्याना सगळं कुठे आणि कसं adjust करू? असे झाले. या २ तासांचा हिशेब डोक्यात ठेवण्याचा नवीन एक्स्ट्रा टास्क, आधीच बिझी असलेल्या आयुष्यात ओढवून घेतला. इथे गल्लत होऊ लागली. शरीरावर सकारात्मक परिणाम दिसू लागला होता व वजन ही फटाफट कमी झाले, उत्साही पण वाटू लागले पण त्यासाठी घरात काहीतरी uneasy काम सुरु झाले. आधीच मुलांचे अभ्यास, ऑफिसची तयारी, घरच्यांसाठी स्वैपाक, नाटकाच्या practices, घरकाम (अमेरिकेत सगळे स्वतःच करावे लागते हे आताशा सर्वपरिचित आहेच. नवीन मुलींना हे समजले आहे त्यामुळे अमेरिकेतला नवरा 'अजिबात नको' असे म्हणणारी पिढी तयार झालीये. ) आणि त्यात आता हे अजून कामच वाढले.

तर सांगायचं मुद्दा हा की च्यायला, ही सगळी कामं कोण करणार? २ तासांचा हिशेब पण ठेवायचा! आणि काय खायचं याचा पण रोज विचार करावा लागे. सगळ्यांचे बरे वाईट सल्ले येऊ लागले, बहिणी: "अगं, मेथीचा पराठा करून ठेवत जा", किंवा "चिक्की खा. ती पौष्टीक असते." सासूबाई : "अगं, सारखं शिळं खात जाऊ नकोस हो, काहीतरी ताजं करूनच खायचं बरका, मुलांकडे दुर्लक्ष नाही ना होत?" "मेथ्या भिजवून मोड आणून उसळ खात जा, हाडांनाही बरी असते या वयात." देवा! आणि हे तर फक्त ४ स्टेप्स पैकी एकच आहे, बाकीचे ३ तर धाब्यावरच!...

मग मला जमेल तसे थोडे थोडे बदल करू लागले, लवकर उठून स्वैपाक करून ठेवून पहिला, विकेंड ला ५ दिवसांचा स्वैपाक करून ठेवायचा प्रयत्न केला...साफ फसला! ऑफिसमधून थोडे लवकर निघून करू म्हटले पण काही केल्या काही सुरळीत जमेचना. मग २-२ तास प्रकरण सोडून दिले आणि इतर ३ स्टेप्स वर भर दिला, भूक लागली की खाऊ असे ठरवले पण ३ आठवड्यात भुकेला "जेटलॅग" आलेला, सारखीच भूक लागत होती. पण वजन कमी होतेय ही सुखाची बाब. मग मला "डोन्ट लूज युअर माईंड" चा उलगडा व्हायला लागला आणि हळू हळू जाणवले की, दोन्ही "लूज" होणे ही परवडण्यासारखे नाही. :)

शेवटी ऋजुता ने लिहिलेले पुस्तक हे अनेक नोकर-चाकर असलेल्या लोकांसाठी परफेक्ट आहे असा मी निष्कर्ष काढला आणि काही काळ तरी modified version चालू ठेवले. नाटकासाठी हवा तो परिणाम झाला आणि अश्याप्रकारे नाटकाच्या निमित्ताने मी आयुष्यात पहिल्यांदा डाएट च्या नादी लागले खरी!

१ तास चालणे आणि थोडे थोडे खाणे जमले. नाटक झाले पण पुढे असलं काही चालू ठेवण्याला अज्जिबात motivation राहिले नाही. "तुझे आता बास हं!" असा सगळ्यांचा सूर येऊ लागला. मग झाले परत पहिले पाढे ५५.... आता ऐकलेले जाणवू लागले, ४० शी जवळ येउ लागली की स्वतःचे हॉर्मोन्स कसे लाडात येतात आणि फिट रहायला जाम मदत करत नाहीत.

मग पुढच्या काही वर्षांत मी परत बाळसे धरलेच, ते अगदी मागच्या काही महिन्यांपर्यंत..... आता माझ्या डाएट गाथेत दीक्षितांनी का आणि कशी एंट्री घेतली हे पुन्हा कधीतरी.

**शीतल सोनार**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | सा | मी | | गो | मू | त्र |
| ना | | | ता | क | | य |
| क | र्णो | प | क | र्णी | | स्थ |
| ल | | रं | | | न | |
| नी | | प | द | र | मो | ड |
| य | | रा | व | ण | | र |
| | ख | ग | | धु | | का |
| आ | | त | | मा | स | ळी |
| का | स | | म | ळी | | |
| श | र | | नो | | झुं | ज |
| | क | | ब | | | ड |
| अ | व | हे | ल | ना | | त्व |

## शब्दकोड्याचं उत्तर

## Thursday, July 11, 2019

Business Conference (My Investments and Business Plans)
Continuing Medical Education
Uttarrang (Full day dedicated for seniors)
Banquet (Dinner & Entertainment)

## Fri-Sun, July 12-14, 2019

High Quality Social, Cultural, Educational and Spiritual Programs
Six Exciting Competitions
Vibrant Young Adult Track
Vendor Exhibitions
Art and Photography Exhibition
Shobha Yatra
Delicious Food Options

## Donations Benefits

Donation packages range from Individual donations to Gold level donations. Benefits vary based on donation level -

- Complimentary tickets
- Hotel Rooms @ Discounted Rates
- Complimentary Parking
- Premier Lounge access for meals
- Preferred Seating based on level

## Sponsorship Packages

Various sponsorship packages are available for businesses to consider. Sponsorship benefits vary based on level of sponsorship -

- Digital Ad Displays
- Sponsor Logo on the website
- Banner Displays
- Hotel Room or Suite
- Complimentary tickets
- Booth Presence
- Stage Time
- and much more



**Don't miss this grand gathering of**

**4500+ Marathi *rasiks* and internationally renowned artistes/experts along with North American Marathi *kalakar* and achievers under one roof.**

Early Bird Registration ends Jan 31.

Hurry!

# BMM2019 DALLAS

## July 11-14, 2019

**at Kay Bailey Hutchison Convention Center Dallas**

www.bmm2019.org
www.facebook.com/bmm2019
Reach us at contact@bmm2019.org

# कल्चर्ड 'संस्कृती'




संध्याकाळची वेळ. घरी पाहुणे मंडळी आलेली. चहा-पोहे वगैरे पदार्थ संपवून निवांत गप्पागोष्टी चाललेल्या. बहुधा कामाची गोष्ट झाली असावी! कारण पाहुणे मंडळी निघण्याच्या बेतात होती. हल्ली कोणी सहज येतो असं म्हटलं; तरी ऐकणा-याने ते कामासह येतो असंच ऐकायचं असतं. असो. तो भाग निराळा. एरवी पाहुणे आले की अंदाज घेऊन, म्हणजे कोणकोण आहे, कितीजण आहेत, वगैरे गोष्टींची वर्दी स्वयंपाकघरात देणे. पाण्याचे ग्लासेस, चहाचे कप इत्यादींची ने-आण करणे या गोष्टी सोडल्या; तर मोठ्या लोकांना बाकी लहानांची लुडबूड नको असते. मुलं मोठी होतील तशी ही समीकरणे देखील बदलतात. पूर्वी (आता पूर्वीच म्हणावं लागेल) एक गोष्ट मात्र कायम होती. पाहुण्यांपैकी वडिलधा-यांच्या पाया पडून आशीर्वाद घेणे! संस्कृतीच आपली ती! मोठं झाल्यावरही हे बदलण्याचं काही फारसं कारण नाही.
ह्या वेळी देखील याच सवयीने पुढे आलो आणि नमस्कारासाठी खाली वाकलो तोच "छे! छे!! मी नमस्कार वगैरे करू देत नाही" हे वाक्य थेट माझ्या संस्कारांना येऊन टोचलं! या शक्यतेचा मी विचारच केला नव्हता. तसाच रेटून नमस्कार करावा तर आशीर्वाद नक्की काय मिळेल ही चिंता. तसाच उठून उभा राहिलो तर फजिती अटळ. खरंतर घरी आलेल्या वडिलधा-या व्यक्तींचा आशीर्वाद घेणे, ही आपली संस्कृती. सुसंस्कृत घरातील मुलगा म्हणून ती जपणं हे आपलं कर्तव्य अशी शिकवण. त्याच कर्तव्याच्या आदरापोटी मी झुकलो होतो की ओझ्यामुळे वाकलो होतो तेच कळेना! अशा विचित्र अवस्थेमध्ये काही क्षण गेले. कसाबसा स्वत:ला सावरून उभा रहातो न रहातो तोच आता पुढच्या व्यक्तीला नमस्कार करू की नको या विवंचनेनं मला ग्रासलं. थोडक्यात त्या बाईंनी forwardness च्या no ball वर माझी चक्क विकेट काढली होती. पाहुणे निघून गेले पण प्रश्न तसेच राहिले. गोष्ट छोटी होती पण झालेल्या अनेक बदलांची साक्ष पटवून देणारी होती.
वपुंचं एक वाक्य आठवलं 'बुद्धीची उपासना हीच भक्ती आणि भक्तीने कृती हीच संस्कृती'. आता जिथे बुद्धी आली तिथे अंधानुकरण थांबलं. अंधानुकरणाचा संबंध हा भितीशी येतो, भक्तीशी नाही. श्रद्धा आणि भय यामध्ये गल्लत झाली की अंधश्रद्धेची जोडी परंपरेशी लावली जाते. परंपरा ही संस्कृतीची सवत! संस्कृती जेव्हा कुळाचारावर किंवा धर्मावर परावलंबी होते तेव्हा तिची परंपरा होते. परंपरा कायम रहातात, संस्कृती मात्र समाजासोबत बदलत जाते. इतर प्राण्यांपासून माणसांना वेगळं करण्याची ताकद संस्कृती मध्ये आहे. काही रुढी परंपरा त्याला पुन्हा पशूरुपात प्रकट करु पहातात. या दोघांतील फरक 'वा'चता आला नाही तर नर काय नी 'वा'नर काय सगळं सारखंच.



बघता बघता मी नमस्कार करू देत नाही हे मानाचं केव्हा आणि कसं झालं हेच उमगलं नाही. जरा मागे वळून बघितलं की भरभरून आशीर्वाद देणारे शिक्षक डोळ्यांसमोर उभे रहातात. या दोन परस्पर भिन्न विचारांमध्ये समाजाची दोलायमान स्थिती झाली आहे. पाठीवर थाप मिळवण्यासाठी देखील आदराने त्या व्यक्तीपुढे वाकावे लागते हे good vibes चे फक्त स्टेटस ठेवणा-यांना कसं उमगणार? बदल हा अटळ आहे आणि तो हवाच! प्रवाहाचं डबकं झालं की जंगली प्राणी देखील त्याला तोंड लावत नाहीत. संस्कृतीचही तेच, तीही बदलत राहिली पाहिजे. पण बदलाला विचारांची जोड हवी. वास्तविक संस्कृती, परंपरा या समाजासाठी दुधावरील सायीप्रमाणे असतात. दुधाला सायीचे ओझे कधीच होत नाही उलट त्यामुळेच तर ते वर येते याउलट साय फाटली तर दूध देखील ऊतू जात नाही. (समाजाचा उत्कर्ष होत नाही)

# स्नेहबंध

'अति सर्वत्र वर्जयेत' असं म्हणतात. अतिचिकित्सा हीदेखील मारकच. हे असंच का? ह्यामागे काय कारण आहे? अशा प्रश्नांमागे बहुतेकदा चिकित्सेपेक्षा तुच्छताच डोकावत असते. खरंतर साहेबाच्या सोयीसाठी आपल्याकडील पंधरवड्याचा आठवडा कधी झाला आणि रविवार एक सुट्टीचा दिवस म्हणून केव्हापासून जाहीर झाला याचा पत्ता आपल्याला लागला देखील नाही. आपले सगळे सण देखील पौर्णिमा-अमावस्येच्या हातात हात घालून येतात. मग उगाच रविवारच्या सुट्टीचं प्रकरण कशासाठी? अर्थात सध्याच्या ग्लोबलाईज्ड कल्चर मध्ये हा प्रश्न चुकीचाच ठरतो!

आता काळ बदलला, त्यानुसार माध्यमं बदलली तरी चांगल्या वाईटाची ओळख होणं महत्वाचं. केवळ पाया पडणंच महत्त्वाचं मानलं तर संपूर्ण समारंभात दुर्लक्षित असलेल्या म्हाता-या आजीची आठवण शेवटी पहिल्या नमस्कारावेळीच येते. अर्थ न समजता वागलं म्हणजे लोक स्वत:च्या मुलाचे नाव देखील आवडीने अर्श (मूळव्याध) ठेवतात. नव्या नव्या ट्यूबलाइट्स आल्या तेव्हा पुलंना चाळीच्या पडक्या भिंती लख्ख दिसत होत्या. हल्ली युट्युब वगैरे सोशल मीडियावर समाजाची अशीच अवस्था बघून फार वाईट वाटतं.

**संकेत मुंढे**

# स्वप्नभंग

धुंदीत तू, मी मगन मस्त
मद मस्त यौवना चुंबती
हे नयन माझे मदन मस्त
धुंदीत तू, मी मगन मस्त

झिरमिळ कपड्यातूनी खुले
रंभा रतीसम हा कमळ
भडकूनी जाई अंतरी
मदनापरी हा मन् भंवर

जे अंतरी, ते ओठावरी
सांगू कुणा, सांगू कसे मी
मिलनास आतुर या सुरां
देऊ कसा पडसाद मी

हे थंड अंग, उधळे प्रेम रंग
रत्ना परी, सुलखे विहंग
भेटू कधीच्या यम यातना
ना होऊ दे, हा स्वप्न भंग

**निरंजन हुंबड**

# Carrying Dr. King's Legacy into the Future




On August 23rd 1963, Martin Luther King Jr. rose onto the steps of the Lincoln Memorial and proclaimed four words that would resound powerfully through the next five decades: "I have a dream". Through his inspiring and visionary speeches, energetic marches and resilient spirit, Dr. King's dream spurred the civil rights movement, leaving behind a powerful legacy of social justice, civil rights and peaceful demonstration. Although society has made great strides toward achieving civil liberties across the racial divide since Dr. King's death, our journey is far from over. Dr. King stated in his infamous speech that "1963 is not an end, but a beginning". He meant that he was blazing a trail, and that we were just launching the movement. This year marks Dr. King's 90th birthday. We can honor our leader's legacy on this special occasion by making a commitment to continue fighting Dr. King's battle for social and political justice.

One way to help carry forward Dr. King's legacy of civil rights is to advocate for marginalized people. During his lifetime, Dr. King represented the minorities by voicing their concerns. He was a beacon of light for those who felt invisible. Dr. King's unmatched energy and optimism inspired millions. It is important for individuals today to pave the way forward by making a commitment to speak on behalf of disadvantaged people. Fifty years after Dr. King was assassinated in Memphis, minorities still do not enjoy the same liberties as the mainstream population: Latino families are unable to secure safe and affordable housing due to poverty and local discrimination. Black teens are victimized and face death threats for the color of their skin. Children sacrifice their right to a basic education thanks to underfunded and understaffed schools. Black families are unable to get the health treatment they need because they are uninsured. Silent prejudice, ignorance and poverty is at the root of many of these issues. There is no simple solution to end this suffering. However, there are small steps that individuals can take to help enact change on a societal level. For example, attending marches and rallies will bring to light prevailing issues of racial discrimination and inequality in housing, healthcare and education. Bringing these concerns to legislators is one way to raise awareness and enact political change. It is also beneficial to join or start local chapters of advocacy organizations such as Black Lives Matter or NAACP. Serving on a local government board whose purpose is to portray minority interests is another tool. Power is in numbers, and if we as a community commit to collectively advocate for minorities' rights, we can begin to see real progress within our communities.



In addition to advocacy, it is equally critical to invest in local communities. People feel valued once others show an interest in their lives. Empowering a community may be as simple as donating books to a run-down school, helping out at a food drive or volunteering to tie blankets for a homeless shelter. These small actions can send a strong message to those who receive the care: that they are worthy and capable of doing more for themselves.

People can combat poverty by investing in local communities. This will not only empower people to take ownership for their own actions, but also foster a sense of pride within communities. Dr. King was a leader who inspired others to take ownership of their rights. His sermons and marches garnered widespread support and activism because they empowered people to take action for their children, their communities and themselves. Creating this culture today can inspire people to take charge of their own destinies.

During the March for Washington in 1963, Dr. King echoed the hopes of a nation torn by social and political injustice. Although our society has transformed significantly since then, the way to inspire community change remains the same. Political advocacy, investing in communities and leadership will enable us to blaze a new path toward achieving civil rights for all. In his speech, Dr. King stated that "there is no turning back" on this path. We must face the future in order to overcome the differences that divide us and embrace one another as brothers and sisters. Above all, we must pledge to guarantee life, liberty and the pursuit of happiness – true freedom – to all.

सुप्रिया जळूकर



> "Thanks to Maya Prep I earned a perfect composite score on my ACT in addition to scoring in the top 95% on the SAT!"
>
> - Smit, Harvard University



## Welcome to Maya Prep

Applications to America's Colleges and Universities continue to increase every year leading admission rates to shrink. To manage the vast number of applications, schools commonly rely on standardized test scores as a way to screen students.

The SAT and ACT will be two of the most important tests of your educational career.

There are many resources available to all students to prepare for the SAT, ACT, and the PSAT. However to stand out, to truly stand out, you need a mentor and a coach with the skills and expertise and instill in you the strategies, discipline, and rigor required to maximize your potential on test day.

Goals of the Maya Prep program include getting our students admitted to schools and programs of their choice and maximize scholarships.

**It is difficult to prepare for the test, the good news is you don't have to do it alone...**

## The Maya Prep Advantage

- Average SAT Composite Score **improvement of 200 points**
- Average ACT Composite Score **improvement of 4 points**
- Many of our PSAT students have been awarded the $2,500 National Merit scholarship. This scholarship is awarded only to 2,500 students out of about 1.5M applicants.
- More than 100 students with an ACT Composite score of 33 or above (**99 percentile**) including 34, 35, and 36 out of 36. Average composite score of 30 (96 **percentile**)
- Students admitted to **top schools including Harvard, Columbia, MIT, CalTech, University of Michigan, Northwestern, Cornell, UC Berkeley, Notre Dame, Michigan State University, Wayne State, Purdue, University of Virginia, University of Chicago**, and many more!

## What We Offer

- Proven Results
- Qualified Instructors
- Test-Driven Training
- Regularly Graded Homework
- Face-to-Face Classes and Remote Capabilities
- Customized Classes
- Admission Counseling
- Essay Assistance
- In-person/Remote Conferences with Students and Parents
- Specially Crafted Study Material

## About Us

- Motivational teachers with MBAs (Ross School of Business, University of Michigan) with a combined 20+ years of successful teaching experience

Contact Us

**Maya Prep**
30368 Norwich Dr.
Novi, MI 48377
(248) 231-4562
info@mayaconsultants.com

**www.mayaprep.com**

# परिवर्तन

संसाराच्या धकाधकीतून जीवनाची सार्थकता झाली हो ।
वृद्धत्वाच्या उंबरठ्यावर एकाकी जीवनात अध्यात्माची पहाट झाली हो ।।
कृपालुंच्या सत्संगाने कृष्णभक्ती अंगी बाणली हो ।
ऐहिक क्षणाच्या सुखपाशातून मुक्त होण्याची किमया घडली हो ।।

नको उंची वस्त्रे वा अलंकार ।
न आस खाण्याची नको चविष्ट मिष्टान्न ।।
शोध सुखाचा करितो मज अचंबित ।
देवावरी श्रद्धा दृढ हाच एक मंत्र ।।

ध्यास एकची आता - गोविंद राधे ।
आस लागली भेटीची मजला - गोविंद राधे ।।
ध्यानी, मनी, स्वप्नी वसे हा - गोविंद राधे ।
एकचि मागणे, करुणा करावी - गोविंद राधे ।।



**- नलिनी गोरे**

# ऑफिस नांवाच्या खाणीतील रत्नं !



**रत्न #१ Kathy**

मी ऑफिसमध्ये नुकताच एक नवा ग्रुप join केला होता. पहिल्याच दिवशी मी माझ्या नव्या cube मध्ये setup करीत होते इतक्यात पाठून आवाज आला “Hi Sue, welcome to the group! “ मी पाठी वळून बघितलं तर एक उंच धिप्पाड सुमारे ३०० पौंडी, पन्नाशीची, आफ्रिकन अमेरिकन बाई कडेवर एक कळकट मळकट stuffed teddy bear घेऊन उभी होती. तिने स्वतःची ओळख करून दिली “ Hi I am Kathy and this is Fuzzy ( the stuffed bear)! Fuzzy, say hi to Sue, she is new in the group.” ह्या प्रसंगाला तोंड कसं द्यायचं ह्याचा मी विचार करीत होते इतक्यात तिच्या पाठी उभा असलेल्या एका coworker ने खुणेने मला सांगितले she is lonely.

त्याबरोबर मी सुध्दा एक मुरका मारला आणि म्हटलं Nice to meet you Fuzzy !

लहानपणी सोसायटीच्या नाटकांत काम करायची संवय असली कीं अश्या प्रसंगांना तोंड देणं सोप जातं.

कॅथी ऑफिसला नेहमीं उशीरा म्हणजे सुमारे १ वाजता येत असे आणि रात्री उशीरापर्यंत काम करीत असे. ती ऑफिसला कशी येते ते बघण्यासारखे असे. एका luggage carrier वर एक मोठ्ठ ब्राउन पुठ्ठ्याचं बॉक्स असे त्या बॉक्सवर एक १३ इंची TV आणि त्या TV वर FUZZY महाराज विराजमान असत. संध्याकाळीं ऑफिस रिकामं झालं कीं ती TV लावत असे .
कॅथी माझ्या शेजारच्याच cube मध्ये बसत असे त्यामुळे तिच्याशी जास्त संबंध येत असे. ती एक अत्यंत गोड स्वभावाची, उदार मनाची, भावनाप्रधान बाई, stuffed animal ला जिवंत बालकाचं रूप देऊन त्याच्या सहवासात स्वतःला रमवणारी होती. तिला math मध्ये masters डिग्री होती आणि तिच Ph. D चं बरच coursework झालेलं होतं. तिने लग्न केलं होत, पण वर्षाच्या आतच घटस्फोट झाला होता.

एक दिवस कॅथी मला म्हणाली “ hey Sue, I am going for a meeting, if my mother calls, please ask her to call home. Tell her Betsy is waiting for grandma’s call. कॅथीला मूल नाहीं हे मला माहित होतं म्हणून मी तिला विचारलं “ who is Betsy ?”

Kathy : she is my cat
Me : how will she know your mom called?
Kathy: my mom will call and leave a message on the phone tape recorder so that Betsy can hear grandma talking to her.



( In those days-1990 you could leave a message on the phone recorder and you could hear the message while being recorded!)

मी तिला ok म्हटलं पण तिच्या आईचा call काही आला नाहीं .

त्यानंतर कॅथीला एका प्रोजेक्ट साठीं Kansas ला ३ महिन्यांसाठी जावं लागलं . सोमवार ते गुरुवार ती आणि FUZZY Kansas मध्ये असायचे, शुक्रवारी पुन्हा Fuzzy Kathy च्या कडेवर बसून ऑफिसला येत असे. मग ऑफिस मधली बरीच जनता Fuzzy च्या समाचारास यायची, आणि जे कोणी भेटायला आले नाहींत त्यांच्याकडे कॅथी स्वतः Fuzzy ला कडेवर घेऊन " Fuzzy missed you " म्हणून त्यांच्या भेटीला जाई. प्रोजेक्ट संपल्यावर कॅथी परत आली तेंव्हा तिला account ने एक मोठ्ठ पांढर शुभ्र stuffed bear भेट दिलं. पण आम्ही त्याला फक्त एकच दिवस पाहिलं . कळकट मळकट Fuzzy ला तो snowball कधीच replace करू शकला नाहीं.
साधारण Christmas चा सुमार असावा. India मधून ६-७ young मुलं एका प्रोजेक्टवर काम करायला आली होती. Kathy त्यांची mentor होती. थोडक्यात सांगायचं तर Fuzzy ला भावंडं मिळाली होती. ऑफिस मध्ये potluck पार्टी होती. प्रत्येकाने स्वतःची specialty आवडती/special डिश आणली होती. माझ्या बरोबर काम करणाऱ्या रशीदने सामोसे करून आणले होते. थोड्यावेळाने Kathy ४-५ bags भरून भरपूर food घेऊन आली. इतक्यात तिची रशीदने आणलेल्या सामोश्यावर नजर गेली. तिने एका प्लेट मध्ये भरपूर सामोसे भरले आणि म्हणाली my kids would love this आणि त्या इंडियन मुलांसाठी घेऊन गेली. थोड्यावेळानी रशीद आला आणि जवळ जवळ रिकामी झालेली सामोश्यांची प्लेट बघू मला म्हणाला "सामोसे कहा गये? " मी म्हंटलं सामनेवाली रूम मे देखो. कॅथीके बच्चे खा राहे है. थोड्या दिवसांसाठी का असेना कॅथी त्या मुलांची आई झाली होती.

त्यानंतर कांही दिवसांनी ऑफिस मधल्या Mary ला हार्ट अटॅक आला. कॅथीला हे कळल्यावर तिने ताबडतोब Fuzzy ला Federal Express ने Mary ला comfort करायला तिच्या घरी पाठवला. सहा आठवड्यानंतर Federal Express ने Fuzzy पुन्हां ऑफिस मध्ये आला. Mary ने त्याला डोक्यावर पीस लावलेली straw हॅट आणि डोळ्यावर heart shape sunglasses घालूंन पाठवला होता. पुन्हा Fuzzy ला भेटायला लोकांची वर्दळ सुरु झाली.
पहिल्यांदा जरी हा Fuzzy प्रकार विचित्र वाटला तरी १७/१८ वर्षांनंतर इतकी संवय झाली कीं Fuzzy सुध्दा आमचा एक coworker च झाला होता.

सुमारे २००७ च्या सुमाराला कॅथी वरचेवर आजारी पडू लागली. पण ती तिच्या आजाराबद्दल फारसं कांही बोलत नसे. नेहमीं आनंदी असायची. कांही दिवसांनी तिने मेडिकल leave of absence घेतली. नंतर कळलं कीं तिने रिटायरमेंट घेतली .... अगदी कुणालाही न कळवता. आम्ही कॅथी आणि Fuzzy ला खूप miss करू लागलो, आणि एक दिवस वाईट बातमी आली ...कॅथी cancer च्या विकाराने हे जग सोडून गेली होती आणि Fuzzy बिचारा पोरका झाला !!

**रत्न #२ Terry Chen .**



'Made In China' प्रॉडक्ट्स फालतू असतात हे सर्वानाच माहित आहे परंतू ते फालतू म्हणजे किती फालतू असू शकतात त्याच उत्तम उदाहरण म्हणजे Terry Chen!!!

Terry आणि मी एकाच वेळेस Systems Engineer म्हणून नोकरीला लागलो. Terry engineering graduate होती परंतू तिचं खरं कसब म्हणजे काहीही काम न करता लोकांना उल्लू कसं बनवायचं हे होतं.

# स्नेहबंध

Terry ऑफिसमध्ये माझ्या जवळच बसायची त्यामुळे ती काय करते आहे हे मला दिसत असे. बहुतेक वेळा ती कुठल्या ना कुठल्या training क्लास मध्ये असायची. मी तिला कुठल्याही प्रोजेक्ट वर काम करतांना कधींही बघितलं नाहीं. साधारण वर्षा दीडवर्षानंतर ती दुसरा ग्रुप जॉईन करीत असे. साधारण २-३ वर्षांत तिची ही कामाची पद्धत लोकांच्या लक्षात यायला लागली होती. नंतर ती कांही वर्षं कुठेतरी गायब झाली आणि मी तिला विसरून पण गेले. नंतर सुमारे १० १२ वर्षानंतर ती पुन्हा माझ्या ग्रुप मध्ये आली. Terry अजूनही job टिकवून आहे ह्याचं मला आश्चर्य वाटलं!

नेहमीं प्रमाणे तिने वेगवेगळ्या training classes साठी स्वतःचे नाव नोंदवायला करायला सुरुवात केली. त्यापैकीं एका वर्गात ती माझ्याबरोबर होती. एक म्हणजे ती उशिरा यायची, क्लास ची सर्व manuals आपल्या ताब्यात घ्यायची. ( त्या वेळेस IBM , ORACLE हे classes खूप महाग असायचे आणि क्लासमध्ये मिळणारी hard copy manuals हा एक अमूल्य ठेवा असायचं. आता सर्व इंटरनेटवर उपलब्ध आहे त्यामुळे पुस्तकांचं महत्व तेवढं राहिलं नाहीं. ) नंतर ती जेवायला जाते सांगून बराच वेळ गायब असायची आणि आली की वर्गात येऊन चक्क झोप काढायची! क्लासच्या शेवटच्या दिवशी lunch time नंतर गायबच व्हायची. ती माझ्याबरोबर २-३ training classes मध्ये होती पण तिची वागणूक कांही बदलली नाहीं. सर्वांना हाच प्रश्न पडायचं की तिला अजून जॉब वरून काढून कसं नाही टाकलं!

शेवटी आमच्या ग्रुप मधल्या एका वरिष्ठाने ससंदर्भ स्पष्टीकरण दिलं .

जेंव्हा तुम्हीं नोकरीत नवा group join करता तेंव्हा पहिले कांही महिने तुम्हाला शिकायला लागणार हे गृहीत धरलं जात. तुमच्या performance appraisal वर “NEW TO THE JOB “ असा शेरा मिळतो. त्यामुळे आणखी एक वर्ष , पुढील appraisal पर्यंत तुम्ही सुरक्षित! पण Terry बदमाश होती. तिला ही सर्व अंडी पिल्ली माहिती होती. Next performance appraisal व्हायच्या अगोदरच ती दुसऱ्या डिपार्टमेंट मध्यें transfer घ्यायची. ह्या दरम्यान तुमच्या supervisor ला कळून चुकतं कीं ही व्यक्ति काही कामाची नाहीं. परंतु मोठ्या कंपनीमध्यें कुणाला job वरून काढून टाकायचं म्हणजे भरपूर paperwork करायला लागतं, त्यापेक्षा त्या employee ची दुसऱ्या ग्रुप मध्ये पाठवणी केली तर paperwork पण करायला नको आणि सुंठीवाचून खोकला गेला. अशा रीतीने मोठ्या कंपनीत आपला problem दुसऱ्यांच्या गळ्यांत मारला जातो.



एके दिवशी Terry माझ्या cube मध्यें आली. तिचा चेहरा खूप रडवेला झाला होता. ती मला सांगायला लागली “ माझ्या मुलीनें लग्न ठरवलं आहे . मुलगा INDIAN आहे. “ मी तीच अभिनंदन केलं तर म्हणाली मी खूप upset आहे. “I don’t like INDIANS “ मी तिला म्हटलं Indians don’t like Chinese either “ तर मला म्हणाली, माझी मुलगी म्हणाली “ you don’t interfere with my life “ . She doesn’t talk to me anymore!

ह्या बाईला काय म्हणावं ? माझ्याजवळ येऊन मलाच म्हणते “मला इंडियन आवडत नाहीत”. स्पष्टवक्तेपणाला कांही सुमार? ऑफिसमधल्या बहुतेकांना तिने सांगितलं होतं कीं तिच्या बापाने तिच्या आईला सोडलं होतं आणि आणि तो त्याच्या mistress बरोबर रहात होता .

कांही दिवसांनी पुन्हा Terry मला भेटायला आली. ह्यावेळी एक नवीन किस्सा ऐकायला मिळाला. Terry ला कांहीतरी मेडिकल प्रॉब्लेम झाला. तिची मुलगी आणि जावई दोघेही डॉक्टर असल्यामुळे ती मुलीकडे गेली. परंतु मुलीने तिच्याकडे लक्ष दिले नाहीं पण जावयाने विचारपूस केली आणि तिला treatment दिली. मग ती माझ्याकडे जावयाचं कौतुक करायला लागली. मला म्हणाली माझी मुलगी खराब आहे पण जांवई चांगला आहे. मी तिला म्हटलं तुला हा जांवई इंडियन म्हणून नको होता ना ? ती काय म्हणाली होती त्याची आठवण करून दिली.

# स्नेहबंध

सुमारे १८ ते २० वर्ष Terry ह्या डिपार्टमेंट मधून त्या डिपार्टमेंट मध्ये hopping करत कंपनीला उल्लू बनवत होती. शेवटी AUTO companies ना जसे वाईट दिवस आले तसे ऑफिसमध्ये अनेक गटांना भराभर कामावरून काढून टाकायला सुरुवात झाली. अशावेळेस आर्थिक कारणांमुळे कुठलेही कागदपत्रांचे पुरावे न दाखवता तुम्ही employees ना काढून टाकू शकता. त्यामुळे Terry ला layoff करणं सोप्पं झालं.

त्यानंतर कांही दिवसांनी ऑफिसमधली एक मुलगी मला elevator मध्ये भेटली आणि म्हणाली “ "Guess what?? I met Terry yesterday. She was in the training class at the same location where I had gone for training class. She works for FORD now !!“

मनांत म्हटलं वा छान! GM ला लुबाडून झालं आता FORD ची turn !
TERRY .... equal opportunity employee !!!

ता.क. खाणीत अजून पुष्कळ रत्न शिल्लक आहेत. हळू हळू काढलेली बरी !

**Shama Sukhtankar**
**Shama226@yahoo.com**



With
Best Compliments
from

**Pradeep**
**Kokate**

# स्नेहबंध

## यंत्रांपुढे इथे कविता हरली!



TV, Computer आणि smart phone शी
नवी नवी ही मैत्री झाली
नकळत माझ्या काव्य वहीवर
अबोल्याची धूळ चढली

आयत्या करमणुकीने जे मना ग्रासले
कल्पना करणेही आता श्रमापरी भासले

" चल मित्रा, सहलीला जाऊ, काव्य वेलींवर झोके घेऊ,
कल्पनेच्या गगनी झेपावून येऊ, भाव सरोवरी डुबक्या
घेऊ"
कळकळीने मजला शब्द सखे बोलले,
परी बोल तयांचे हवेतच मुरले

साहित्याशी अबोला आधी नकळत होता
मग यंत्रवेडा जीव आळसावून गेला
मग माझिया आळसाला चढवून झालर
'लिखाणास फुरसत नाही' असा आव मी आणला

डोळे झिजले, नव-विचार कुजले
तरी यंत्रांशी माझे सख्य सुटेना
फडफड फडफड किती काळ करूनि
स्वविचार दिवे मनी गुपचूप विझले

आता मी पण तसाच एक उदासीन
इतर शेकडो जसे इथे जगती
विचार इतरांचे नकळत प्राशुनी
बुद्धिवादाचा देखावा करती

आता मी पण तसाच एक उदासीन
स्वसंगतीचा- एकांताचा मलाही कंटाळा येतो
चुकून धरला यंत्राने अबोला
माझा जीव लगेच गुदमरून जातो

मग का न काव्यांनी मजवर रुसावे?
मग का न शब्दांनी सोडून जावे?
अरेरे! यंत्रांपुढे इथे कविता हरली
आणि काव्य वहीवर धूळ चढली

**ऋतूज देशपांडे**
**(rutooj @gmail.com)**


Wishing you a very
Happy Gudi Padwa
Maharashtra Mandal of Detroit

# The Future of Coatings



## GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS



Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

### Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More...

Please contact us for more information ▸▸▸

**Global Headquarters**
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com